सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, २८ जुलै २०२४ | वर्ष दुसरे | अंक १२८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## नागपुरात २५ दिवसात ७२ डेंग्यूच्या रुग्णांची नोंद

### राज्यात साथीच्या आजारांचा फैलाव

नागपूर : गेल्या काही दिवसांपासून सतत पडत असलेल्या पावसाचा जोर आता ओसरला आहे. मुसळधार पावसामुळे साथीच्या आजारांनी डोके वर काढले आहे. राज्यात लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यू, मलेरिया इत्यादी आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. अनेकांना डेंग्यू, मलेरियाची लागण होत आहे. त्यामुळे आरोग्य विभागाने नागरिकांना विशेष काळजी घेण्याच्या सूचना केल्या आहेत.

ठाणे जिल्ह्यातही दमदार पाऊस पाहायला मिळत आहे. त्यामुळे अनेक साथीच्या आजारांनी डोकं वर काढलं आहे. त्यातच आता रुग्णांना सर्वोत्तम आणि वेळेवर उपचार मिळावेत, यासाठी ठाणे सिव्हिल रुग्णालयात विशेष अद्ययावत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. त्या कक्षात अत्यंत महत्त्वाच्या औषधांचा साठा आणि आपत्कालिन 'पॅरा मेडिकल टीम देखील सुसज्ज ठेवण्यात आली आहे.

ठाण्यातील सिव्हील रुग्णालयात लेप्टो, डेंग्यू, मलेरिया रुग्णांसाठी जिल्ह्यात पॅरा मेडिकल पथक सज्ज ठेवण्यात आले आहेत. तर दुसरीकडे प्रधानमंत्री पीव्हीटीजी विकास मिशन या अभियानांतर्गत आरोग्य आणि पोषणसारख्या मुलभुत सुविधा देण्याबाबत लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यात अदिवासी व अतिदुर्गम भागात एक मोबाईल मेडिकल युनिट मुरबाड आणि शहापूर तालुक्यात सुरु आहेत. तर नऊ मोबाईल मेडिकल युनिट १ ऑगस्टपासून सुरु करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून देण्यात आलेली आहे.

पुण्यात पुरानंतर आता साथीचे रोग पसरण्याची भीती

तर दुसरीकडे पुण्यात पुरामुळे मोठ्या प्रमाणात जनजीवन विस्कळीत झाले होते. पुण्यात अनेक नागरिकांच्या घरात पाणी साचले होते. आता पूर ओसरल्याने पाणी ओसरले आहे, पण अनेकांच्या घरात गाळ, चिखल तसाच शिल्लक राहिला आहे. यामुळे पुण्यात मोठ्या प्रमाणात साथीचे रोग पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे आरोग्य विभागाने विशेष काळजी घेण्याची आवश्यकता आहे. तसेच नागपूर ग्रामीणमध्ये गेल्या २५ दिवसांत ७२ डेंग्यूच्या रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. नागपूर शहरात २५ दिवसांत ५६ चिकनगुनियाचे रुग्ण आढळले आहेत. त्यासोबतच नागपुरात लहान मुलांनाही साथीचे आजार होताना दिसत आहे. त्यामुळे लहान मुलांच्या ओपीडीची संख्या वाढली. तसेच मेडिकल, रुग्णालयातही रुग्णांची वाढ होत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने लक्षणं दिसताच वेळीच उपचार घ्या, असे आवाहन केले आहे.

# राज्यघटनेचे संवर्धन आणि लोकशाहीचे रक्षण करणे ही संसदेची प्राथमिक भूमिका : उपराष्ट्रपती जगदीप धनखड

नवी दिल्ली, २७ जुलै – राज्यघटनेचे संवर्धन आणि लोकशाहीचे रक्षण करणे ही संसदेची प्राथमिक भूमिका आहे, असे प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले आहे. संसद सदस्य हे स्वतःच लोकशाहीचे पालक असून त्यांच्यापेक्षा अधिक गांभीर्याने लोकशाहीचे संवर्धन दुसरे कोणी करू शकत नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले. लोकशाहीमध्ये एखादी गंभीर समस्या निर्माण झाली, लोकशाही मूल्यांवर आघात झाला, तर त्यावेळी तुमची भूमिका निर्णायक ठरते, असे ते म्हणाले.

ते आज राज्यसभेत नवनिर्वाचित सदस्यांसाठी आयोजित केलेल्या अभिमुखता कार्यक्रमात मार्गदर्शन करत होते. यावेळी बोलताना धनखड यांनी ठाम प्रतिपादन केले की संसदेत योग्य प्रक्रियेचे पालन केले तर चर्चे साठी कोणत्याही विषयाची मर्यादा नाही. सभागृहाने घालून दिलेल्या नियमांच्या प्रक्रियेचे पालन केले तर सभापतींच्या आचरणासह, कोणत्याही विषयावर, कोणत्याही व्यक्तीकडून, कोणत्याही सदस्याकडून चर्चा होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

संसदेची स्वायत्तता आणि अधिकार यावर भर देत ते म्हणाले की संसद ही तिच्या प्रक्रिया आणि तिचे कामकाज यांचा विचार करता सर्वोच्च आहे. संसदेच्या सभागृहातील कोणतेही कामकाज हे कार्यकारी किंवा एखाद्या इतर पीठासीन अधिकाऱ्याच्या मूल्यांकना पलीकडचे असते. संसदेमध्ये जे काही घडते त्यामध्ये सभापतींव्यतिरिक्त इतर कोणालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. कोणताही कार्यकारी किंवा इतर कोणत्याही संस्थेला तो अधिकार नाही, असे त्यांनी नमूद केले.

धनखड यांनी संसदेतील सदस्यांनी स्वीकारलेल्या हिट अँड रन दृष्टीकोनाबाबत चिंता व्यक्त केली, जिथे एखादा सदस्य संसदेत बोलण्यापूर्वी प्रसारमाध्यमांना मीडिया बाईट देतो, केवळ लक्ष वेधण्यासाठी आणि प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्धी मिळवण्यासाठी संसदेत बोलतो आणि इतर सदस्यांचे म्हणणे न ऐकताच सभागृहातून बाहेर जातो आणि बाहेर जाऊन पुन्हा प्रसारमाध्यमांना बाईट



देतो. सभासदांमध्ये, विविध मुद्यांवर चर्चा करण्यापेक्षा वैयक्तिक टीका करण्याची आणि केवळ काही व्यक्तींना खूष करण्यासाठी आरडाओरडा आणि घोषणाबाजी करण्याची वृत्ती वाढत असल्याची बाब देखील त्यांनी अधोरेखित केली. यापेक्षा दुसरी कोणतीही विभाजनवादी वृत्ती असू शकत नाही, असे त्यांनी सांगितले. आणीबाणी हा भारतीय लोकशाहीमधील अतिशय वेदनादायी, हृदयद्रावक आणि काळाकुट्ट कालखंड होता असे वर्णन करत धनखड यांनी सांगितले की त्या काळात आपली राज्यघटना म्हणजे केवळ एक कागदाचा तुकडा बनून गेली होती आणि मूलभूत हक्कांचे गंभीर उल्लंघन केले जात होते आणि नेत्यांना अन्यायकारक पद्धतीने तुरुंगात डांबले जात होते. धनखड यांनी संसदेच्या एकंदर कामगिरीबाबत अभिमान व्यक्त केला. आपल्या संसदेच्या सदस्यांनी सुरुवातीपासूनच जनतेच्या हिताची कामे केली आहेत आणि आणीबाणीचा कालखंड वगळता या देशाच्या विकासामध्ये योगदान दिले आहे, असे उपराष्ट्रपती म्हणाले.

सभागृहात बोलणाऱ्या सदस्याला संविधानाने दिलेल्या संसदीय स्वातंत्र्याच्या गैरवापराबद्दल चिंता व्यक्त करत धनखड म्हणाले की लोकशाही आणि संविधानाचे रक्षण करण्यासाठी सदस्यांना हे स्वातंत्र्य दिले आहे. कोणत्याही गैरवापरावर संसदेच्या नियमांनुसार कारवाई केली जाईल, असे ठाम प्रतिपादन करत ते म्हणाले की सदस्यांविरोधात कारवाई करताना त्यांना आनंद होत नाही.

सहा दशकांमध्ये प्रथमच सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानांनी कार्यभार सांभाळला आहे, हे नमूद करत धनखड यांनी, पंतप्रधान कुठल्याही पक्षाचा नसतो, पंतप्रधानांना सभागृहाचे नेते म्हटले जाते, पंतप्रधान देशाचे असतात यावर भर दिला. राज्यसभेत अलिकडेच कामकाजात व्यत्यय आणल्याबद्दल चिंता व्यक्त करताना, उपराष्ट्रपतींनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला पंतप्रधान उत्तर देत असताना अनादर दाखवण्यात आल्याबद्दल टीका केली.

पक्षपात केल्याचे आरोप उपराष्ट्रपतींनी ठामपणे फेटाळून लावले आणि संविधान, कायद्याचे राज्य आणि राष्ट्रीय हीत या प्रति वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. त्यांनी सर्व सदस्यांना या मूलभूत तत्त्वांवर चिंतन करण्याचे आणि संसदीय कामकाजाची प्रतिष्ठा राखण्याचे आवाहन केले.

संसदीय वर्तनाबाबत मार्गदर्शन करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करताना, धनखड यांनी सदस्यांना संसदीय प्रोटोकॉल अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आतापर्यंतच्या सर्व सभापतींनी घेतलेल्या निर्णयांचा सखोल आढावा घेण्यासाठी प्रोत्साहित केले.

राजकीय पक्षांद्वारे ठरवून कामकाजात व्यत्यय आणण्याच्या प्रथेसंदर्भात बोलताना धनखड यांनी, अशा कृतींच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि त्यांची तुलना इतर देशांच्या मजबूत लोकशाहीशी केली, जिथे असे घडत नाही. भारतासारखा समृद्ध सांस्कृतिक वारसा नसतानाही तिथे संसदीय कामकाज प्रभावीपणे चालते.

धनखडयांनी निदर्शनास आणून दिले की लोकशाहीचे जे मूलभूत स्तंभ आहेत – कार्यकारी, न्यायपालिका आणि विधिमंडळ, हे कमकुवत झाल्याचा परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. सभागृहात आदर आणि विधायक संवाद पुन्हा राखला जावा, असे

## नीती आयोगाच्या बैठकीत माईक बंद केला–ममता बॅनर्जी

### केंद्र सरकारकडून ममता बॅनर्जींच्या आरोपांचे खंडण

नवी दिल्ली, २७ जुलै : पंतप्रधानांच्या नेतृत्त्वात दिल्लीला झालेल्या नीती आयोगाच्या बैठकीत बोलण्यासाठी पुरेसा वेळा दण्यात आला नसल्याचा आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला. अपघ्या ५ मिनीटात माईक बंद केल्यामुळे बैठक अर्धवट सोडून बाहेर पडल्याचे त्यांनी सांगितले.

नीती आयोगाच्या बैठकीवर गैरभाजप शासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी बहिष्कार टाकला होता. परंतु, ममता बॅनर्जींनी या बैठकीला हजेरी लावली. या बैठकीत अवघे ५ मिनीटेच बोलू दिले असे सांगत त्यांनी सरकारवर भेदभाव केल्याचा आरोप लावला. बैठकीतून बाहेर पडल्यावर ममतांनी सांगितले की, केंद्र सरकारने राज्य सरकारांशी भेदभाव करू नये असे बैठकीत सांगायचे होते. परंतु, आपल्याला केवळ ५ मिनीटेच बोलू दिले. त्यामुळे आपले बोलणे अर्धवट राहिले. आपल्या आधी बोलणाऱ्यांना



१० ते २० मिनीटांचा वेळ देण्यात आला होता. परंतु, आपण बोलत असतानाच माईक बंद करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. हा केवळ पश्चिम बंगालचा नव्हे तर सर्वच प्रादेशिक पक्षांचा अपमान असल्याचे बॅनर्जी म्हणाल्या.

दरम्यान, ममता बॅनर्जी यांनी केलेल्या आरोपांबाबत दुसरी बाजू समोर आणत पीआयबीने वेगळाच दावा केला. पीआयबी फॅक्ट चेकरने ट्विटरवर (एक्स) यासंदर्भात एक व्हिडीओ शेअर केला असून, त्यात लिहिले आहे की, नीती आयोगाच्या बैठकीमध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा माईक बंद करण्यात आल्याचा करण्यात आलेला आरोप चुकीचा आहे. तेथील घड्याळ केवळ बोलण्याची वेळ संपुष्टात आल्याचे दर्शवत होते. एवढंच नाही तर इशारा देणारी घंटाही वाजवण्यात आली नाही. केवळ बोलण्याची वेळ संपल्याचे घडाळ्यात दर्शवण्यात आले होंत. क्रमवारीनुसार पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री दुपारी भोजनानंतर बोलणार होत्या. मात्र पश्चिम बंगाल सरकारकडून करण्यात आलेल्या अधिकृत विनंतीनंतर त्यांना बोलण्यासाठी सातवा क्रमांक देण्यात आला. ममता बॅनर्जी यांना वेळेआधीच बैठकीतून माघारी जायचे होते. त्यामुळे हा बदल करण्यात आला होता.

## तर राजकारणातून संन्यास घेईल : प्रफुल्ल पटेल

मुंबई : अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्या विधानाने सध्या राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. त्यांनी थेट राजकारणातून संन्यास घेण्याची घोषणा केली आहे. त्यांचे हे विधान सध्या चर्चेत आले आहे.

आरक्षणाला जर धक्का लागेल तर नक्कीच मी शंभर टक्के राजकारणातून संन्यास घेणार, पदाचा आणि राजकारणात राहण्याचा कोणताही अर्थ नाही, म्हणूनच मी त्याग करेल, असं गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रसचे नेते खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केलं. या देशात आरक्षण, हे संविधानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेलं आहे. त्या आरक्षणाला कोणीही धक्का लावू शकत नाही. त्याचा मूळ ढाचा कोणीही बदलू शकत नाही. लोकसभेच्या निवडणुकीत उगीचच अपप्रचार एवढा झाला. लोकं बळी पडलेत. पण आता लोकांच्या लक्षात आलेलं आहे. आणि आमच्यासारखे अनेक जे कोणी संसदेत संविधानाची शपथ घेऊन बसलेली आहेत ते असं होऊ देणार नाही असं स्पष्ट वक्तव्य प्रफुल पटेल यांनी केलं.

मराठ्यांना आरक्षण मिळालेच पाहिजे, आमचं सरकार ठाम

काँग्रेस, आमची पूर्वीची राष्ट्रवादी आणि सर्वच पक्ष हे अनेक वर्ष सत्तेत राहिले. त्यांनी काहीच केलं नाही. निवडणुकीच्या काळात आरक्षणाचा मुद्दा विरोधक पुढे करत असल्याची टीका प्रफुल्ल पटेल यांनी केली आहे. आमची सरकार ठाम आहे मराठ्यांना आरक्षण मिळालंचं पाहिजे. त्या दृष्टीने विधानसभेत विधेयक पारित झाला, कायदा पण बनला आहे. आणि दहा टक्के आरक्षण दिला आहे. आता ज्यांना तेही पटत नाही, ते विरोधाभास करतात.

## जम्मू–काश्मीर : भीषण अपघातात ८ जणांचा मृत्यू

### अपघाताला बळी पडलेले सर्वजण एकाच कुटुंबातील

श्रीनगर, २७ जुलै : जम्मू–काश्मीरच्या अनंतनागमध्ये आज, शनिवारी झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मृतांमध्ये ५ लहान मुलांचाही समावेश आहे. दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील कोकरनागच्या डाकसुम भागाजवळ वाहन उलटल्याने हा अपघात झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमो गाडी जम्मू भागातील किश्तवाड येथून येत होती. गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ती रस्त्यावर उलटली. या अपघातात एकाच कुटुंबातील ८ जणांचा मृत्यू झाला असून त्यात ५ मुले, २ महिला आणि एका पुरुष यांचा समावेश आहे. अपघाताला बळी पडलेले सर्वजण किश्तावर येथील रहिवासी असून यामध्ये इम्तियाज राथर (वय ४५), अफरोजा इम्तियाज राथर (वय ४०), रेश्मा



माजित अहमद (वय ४०), अरिबा इम्तियाज अहमद (वय १२), अनिया जान इम्तियाज अहमद (वय १०), अबान इम्तियाज अहमद (वय ६) मुसैब माजिद अहमद (वय १६), मुशैल माजिद अहमद (वय–८) यांचा समावेश आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## सिल्लोड येथे दि.२ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान

### पात्र महिलांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवा-पालकमंत्री सत्तार

छत्रपती संभाजीनगर दि.२६ (जिमाका)– मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाची सुरुवात दि.२ ऑगस्ट पासून सिल्लोड येथून होणार आहे. त्यासाठी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे. जिल्ह्यात पात्र महिलांपर्यंत शासकीय यंत्रणेने योजनांचा लाभ पोहोचवून महिला सशक्तीकरणाचे ध्येय्य पूर्ण करावे,असे निर्देश पणन व अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी आज यंत्रणेला दिले.

जिल्हा परिषदेच्या वेरुळ सभागृहात आज पालकमंत्री सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुनिल भोकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन तुपे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, श्रीराम पाटील, केशव तायडे तसेच सर्व यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.



माहिती देण्यात आली की, शुक्रवार दि.२ ऑगस्ट रोजी महिला सशक्तीकरण अभियानाची सुरुवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिल्लोड येथे होणार आहे. त्याअनुषंगाने पालकमंत्री सत्तार यांनी आज महिलांशी संबंधित योजनांचा आढावा घेतला.

महिला लाभार्थ्यांना लाभ देऊन त्यांचे जीवनमान उंचावणे व त्यांचे सशक्तीकरण करणे हे शासनाचे ध्येय्य असून त्याच्या पूर्ततेत यंत्रणांनी योगदान द्यावे,असे श्री. सत्तार यांनी सांगितले. ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी महिलांच्या सबलीकरणासाठी अनेक योजना लागू केल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून राज्यातील महिलांचे सक्षमीकरण करतांना प्रत्येक घटकातील महिलांपर्यंत योजनांचे लाभ पोहोचणे आवश्यक आहे. त्यासाठी यंत्रणांनी काम करावे,असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या नोंदणीचे काम जिल्ह्यात उत्तम होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

## गांधी,नेहरु,पटेल,आंबेडकर या महापुरुषांचे देशाच्या जडणघडणीत अमूल्य योगदान : पद्मविभूषण शरद पवार

### खासदार शरदचंद्र पवार यांच्या हस्ते शेषराव चव्हाण यांच्या ४ पुस्तकांचे प्रकाशन संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.२७ : महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व महापुरुषांचे देशाच्या जडणघडणीत अमूल्य योगदान असून हे महापुरुष आपल्या देशाला लाभले हे आपल्या देशाचे भाग्य असल्याचे प्रतिपादन पद्मविभूषण खा. शरद पवार यांनी यावेळी केले.

ज्येष्ठ विचारवंत व अभ्यासक शेषराव चव्हाण यांच्या ४ पुस्तकांचा प्रकाशन सोहळा पद्मविभूषण खासदार शरदचंद्र पवार यांच्या हस्ते आज एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात संपन्न झाला. यावेळी पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांनी उपस्थितांशी संवाद साधला. या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर





कदम तर मंचावर खासदार कल्याण काळे, आमदार राजेश टोपे, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव आणि सचिव अंकुशराव कदम उपस्थित होते. या प्रकाशन सोहळ्यात शेषराव चव्हाण यांच्या ९० नॉट आऊट , नेहरू– पटेल रिलेशन्समिथ अँड रियॅलिटी,डॉ.बी.आर.आंबेडकर डिसअपॉईंटेड अँड डिसइल्युशण्ड इन दि इव्हनिंग ऑफ हिज लाईफ, कलप्रिट्स ऑफ पार्टीशन या ४ पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

पुढे बोलताना खासदार शरद पवार म्हणाले, महात्मा गांधी यांनी विचारपूर्वक जवाहरलाल नेहरू यांचे व्यक्तिमत्व हे या देशाच्या एकजुटीला आणि उभारणीला उपयुक्त पर्याय असल्याचा दृष्टिकोण स्वीकारला होता. पंडित जवाहरलाल नेहरू आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्यासंदर्भात बरेच लिखाण लिहिले गेले आहे. हा देश एकसंध करण्याच्याकरिता पटेलांनी टाकलेली पाऊले हा या देशाच्या ऐक्याच्या इतिहासाचा एक महत्वपूर्ण भाग आहे. ते शेतकरी आणि कष्टकरी यांच्या हिताची जपवणूक करणारे नेते होते. आधुनिक विज्ञानावर लक्ष केंद्रित करणारे नेतृत्व आणि संपूर्ण विश्वामध्ये भारताचे एक स्थान निर्माण करणारे व्यक्तिमत्व म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांची ओळख होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला एकसंध ठेवण्याची कामगिरी संविधानाच्या माध्यमातून केलेली आहे. पाण्याच्या बाबतीत त्यांनी घेतेलले तत्कालीन निर्णय देशाला समृद्धीच्या मार्गावर नेणारे होते. राष्ट्राच्या उभारणीमध्ये मोलाची कामगिरी करणारे एक अत्यंत महत्वाचे नेते म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्याला मिळाले, हे आपल्या सर्वांचे भाग्य आहे.

शेषराव चव्हाण हे सतत काहीतरी लिहीत असतात. एखाद्या राजकीय व्यक्तीच्या जीवनावर अनेक व्यक्ती लिहीत असतात मात्र, शेषराव हे काश्मीर विषयासह पक्षांच्या जीवनावर अभ्यास करणाऱ्या सलीम अली यांच्याबद्दलही त्यांनी लिहिले आहे. या आज प्रकाशित झालेल्या ग्रंथात आलेल्या व्यक्तींनी देशाच्या उभारणीमध्ये मोठे योगदान दिले असल्याचे आपण मान्य करतो. या लेखनामध्ये वेगवेगळे दृष्टिकोण लेखकांनी आपल्यासमोर मांडले असून लेखकांनी प्रादेशिक भाषेतही लिखाण करावे, असे मला वाटते. अखंडपणे त्यांनी लिखाण केले असून यापुढेही त्यांनी आपले लिखाण चालू ठेवावे, अशी अपेक्षा यावेळी खासदार पवार यांनी व्यक्त केली.

एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम यावेळी बोलताना म्हणाले, महापुरुषांच्या जीवनातील वैयक्तिक बाबी या इतिहासाचा भाग होत नसून त्यांनी केलेल्या कामाचा समाज जीवनावर होणारा परिणाम तो इतिहासाचा भाग होऊ शकतो. पंडित जवाहरलाल नेहरू हे देशभरात अतिशय लोकप्रिय नेते होते. लोकांच्या डोळ्यात नेता दिसतो आणि ते नेतृत्व, कौशल्य हे त्यांच्या व्यक्तिमत्वात होते. देशाचा नेतृत्व करणारा नेता हा देशाचा नेता असला पाहिजे म्हणून महात्मा गांधी यांनी जवाहरलाल नेहरू यांचे नाव सुचवले. शेषराव चव्हाण हे सतत वाचत राहतात त्यांची आज प्रकाशित होणारी चारही पुस्तके ही दिशादर्शक आहेत. तरूण मुलांना वाचण्यास ही पुस्तके प्रवृत्त करतात. बहुजन समाजातील प्रत्येक माणसांनी ही पुस्तके वाचली पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## उड्डाणपुलावरील ते वळण अतिशय अपघातप्रवण ठोस उपाययोजना करण्याची मागणी

अहमदनगर : शहरातील उड्डाणपुलावर चांदणी चौक भागात वारंवार अपघात घडून जीवित हानी होत आहे. काल बुधवार दि. २४ जुलै रोजी दुपारी चारच्या सुमारास उड्डाण पुलावरून एक ट्रक खाली पडला व जिवीत हानी झाली. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी अभय ललवाणी यांनी जिल्हाधिकारी व प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. श्री ललवाणी यांनी निवेदनात म्हटले आहे की, १) उड्डाणपुलाचा जो भाग / जे वळण अतिशय अपघात प्रवण आहे तेथे वाहनाचा वेग शून्य होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात. २) उड्डाणपुलाच्या अतिशय अपघात प्रवण वळणावर वाहन चालकाचे लक्ष वेधण्यासाठी ब्लींकिंग ॲरो लावण्यात यावेत. ३) अपघात प्रवण वळणावर काँक्रीट कठड्यांची उंची आवश्यकतेनुसार वाढविण्यात यावी. ४) उड्डाणपुलाचे जे वळण अतिशय अपघात प्रवण आहे ते वळण ९० + डिग्री आहे. त्यामुळे वेगात आलेले वाहन अचानक ९० डिग्री मध्ये वळाल्याने असे अपघात होतात. ५) उड्डाणपूल होण्यापूर्वी देखील याच भागात अपघात प्रवण वळणावर अनेकदा वेगात आलेली वाहने अचानक वळाल्यामुळे पलटी होऊन अपघात झाल्याच्या दुर्घटना घडलेल्या आहेत. तरी सदर अपघातप्रवण वळणाची आपण संयुक्तिक पाहणी करून उपरोक्त उपाय योजनांबाबत कार्यवाही करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल ना.अब्दुल सत्तार यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव



सोयगाव,दि.२७ जुलै : मंत्री अब्दुल सत्तार यांची छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांचे गुरुवारी रात्री छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळावर आगमन झाले. पालकमंत्री ना.अब्दुल सत्तार यांच्या स्वागतासाठी त्यांच्या समर्थकांनी विमानतळावर मोठ्या संख्येने गर्दी केली होती. ना.अब्दुल सत्तार यांचे आगमन होताच पक्ष पदाधिकारी , कार्यकर्ते, व त्यांच्या समर्थकांनी जोरदार घोषणाबाजी करीत ना. अब्दुल सत्तार यांचा पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. ना.अब्दुल सत्तार यांचे स्वागत करण्यासाठी विमानतळाबाहेर देखील कार्यकर्त्यांची गर्दी पाहायला मिळाली.फटाक्यांची आतिषबाजी,ढोलताशे वाजवीत कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.छत्रपती संभाजीनगर विमानतळापासून ते सिल्लोड पर्यंत ठिकठिकाणी ना.अब्दुल सत्तार यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

## नगरपंचायत सोयगाव द्वारे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संदर्भात कॅम्पचे आयोजन



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२७ जुलै

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संदर्भात नगरपंचायत सोयगाव द्वारे आयोजित कॅम्प सोयगाव तहसील कार्यालयाचे तहसीलदार मनीषा मेने,प्रभारी मुख्याधिकारी गोरखनाथ सुरे हे सदर योजनेसंबंधी लाभार्थ्यांच्या अर्ज स्थितीचा आढावा घेतानी सोयगाव शहरातील जुना बाजार चौक येथे हजर होते.यावेळी नगरपंचायतीचे कार्यालयीन अधीक्षक शिवाजी जाधव, लेखापाल किशोर मोरे,अर्जासंबंधी माहिती देताना शहर समन्वय दिनेश हिवाळे,लिपीक समाधान गायकवाड, लिपिक राजू जंजाळ,सारंग बागले तथा इतर कर्मचारी उपस्थित होते.यावेळी सोयगाव शहरातील राहिलेल्या सर्व पात्र भगिनींना अर्ज करून सदर योजनेचा लाभ घेणे संबंधी माहिती देण्यात आली.

## बँकॉक ट्रिपचे नाव ऐकूनच हप्पू झाला व्यथित!

एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडमध्ये दरोगा हप्पू सिंग (योगेश त्रिपाठी) बँकॉकला जाणार आहे, पण त्याला मोठ्या संघर्षांचा सामना करावा लागतो. पत्नी राजेशला (गीतांजली मिश्रा) समजावण्याच्या प्रयत्नामध्ये तो कटोरी अम्माला (हिमानी शिवपुरी) नाराज करतो. राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा म्हणाल्या, ''हप्पू राजेशकडे बँकॉकबाबत टिका करतो. दुसऱ्या दिवशी कमिशनर (किशोर भानुशाली) हप्पू आणि मनोहर (नितीन जाधव) यांना सांगतो की, त्यांना प्रशिक्षणासाठी बँकॉकला पाठवण्यात येत आहे आणि त्यांना प्रवासाला जाण्यापूर्वी त्यांच्या पत्नींकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) आणावे लागेल. हप्पूने आदल्या दिवशी राजेशकडे बँकॉकबाबत टिका केली असल्यामुळे तो चिंतित होतो.'' हिमानी शिवपुरी ऊर्फ कटोरी अम्मा म्हणाल्या, ''मलायकाला (सोनल पनवार) एका एन्काऊंटरदरम्यान गोळी लागते आणि रक्तस्राव झाल्यामुळे डॉक्टर तिला रक्त वाढवणारे फूड सेवन करण्याचा सल्ला देतो.

## हवाईसुंदरी बनली अभिनेत्री

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'कैसे मुझे तुम मिल गये' ने हल्लीच एक रोमांचक वळण घेत विराटची पूर्वपत्नी प्रियांका ऊर्फ प्रतिक्षा होन्मुखेचा मालिकेत प्रवेश घडवून आणला. आपली व्यक्तिरेखा ती ज्या प्रभावी पद्धतीने साकारत आहे केवळ त्यावरूनच ती वेगळी ठरत नाही तर ह्या ठिकाणी पोहोचण्यासाठी तिने जो वेगळा मार्ग निवडला आहे त्यावरूनही ती सर्वांपेक्षा भिन्न असल्याचे सिद्ध होते. सात वर्षे हवाई सुंदरीचे काम केल्यानंतर प्रतिक्षाने आपले यशस्वी हवाई करिअर सोडून आपली आवड असलेल्या अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवण्याचे ठरवले. एका सहकाऱ्यामुळे प्रेरित होऊन आणि आपल्या पालकांच्या समर्थनासह तिने मॉडेलिंगच्या क्षेत्रात पदार्पण केले आणि तिथेही आपली कला दाखवून दिली. त्यातूनच पुढे तिला टेलिव्हिजन शोज्मध्ये काम करण्याच्याही संधी मिळत गेल्या.

## 'सॅम बहादूर'च्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअरसह झी सिनेमावर

ह्यावर्षी कारगिल विजय दिवसची २५ वर्षे पूर्ण होत असून हा दिवस आपल्या सैनिकांचे अढळ धैर्य आणि त्याग यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस समर्पित आहे. ह्या निमित्ताने झी सिनेमा अतिशय अभिमानासह भारताच्या सर्वांत महान सैनिकांपैकी एक सॅम मानेकशॉ यांना आदरांजली अर्पण करत आहे. 'सॅम बहादूर'च्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमिअरसह ह्या चित्रपटात प्रेक्षकांना महान सॅम माणेकशॉ यांच्या वीरता, नेतृत्व आणि समर्पणाचा प्रवास अनुभवायला मिळेल. उरी आणि राझी अशा समीक्षकांनी नावाजलेल्या चित्रपटांच्या निर्मात्यांकडून शौर्य आणि देशभक्तीची ही आणखी एक कथा आहे. यात विकी कौशल प्रमुख भूमिकेत असून मेघना गुलजार यांनी ह्या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. ह्या चित्रपटाचा प्रीमिअर तुमच्या टीव्ही स्क्रीन्सवर रविवार, २८ जुलै रोजी दुपारी १२ वाजता आणि रात्री ९ वाजता झी सिनेमावर घेऊन येत आहे.

## इंडियन डीजे एक्सपो-२०२४ ८ ऑगस्ट पासून

'इंडियन डीजे एक्स्पो - २०२४', संगीत निर्मिती, कार्यक्रम आणि मनोरंजनाशी संबंधित तंत्रज्ञान उद्योगाचे सर्वात मोठे वार्षिक प्रदर्शन, नवी दिल्लीच्या प्रगती मैदानावर ८ ते १० ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.प्रगती मैदानाच्या हॉल क्रमांक ८ -११ -१४ मध्ये लाऊडस्पीकरपासून ते स्पीकरचे घटक, म्प्लीफायर, डीजे उपकरणे, लेझर आणि लाइटिंग आणि एलईडी स्क्रीन्सपर्यंतची उपकरणे, स्पेशल इफेक्ट मशीन्स, केबल्स, कनेक्टर्स आणि स्पीकर कॅबिनेटपर्यंत २५० हून अधिक उपकरणे आहेत. ब्रँड्सची विस्तृत श्रेणी दिसेल.

# काम देता का काम.. शेकडो बेरोजगार कामाच्या प्रतीक्षेत

संजय निकम

वाळूज महानगरात : उद्योगनगरीत आपल्या हाताला काही ना काही काम मिळेल, या अपेक्षेने शहरातील मजूर अड्ड्यावर शेकडोच्या संख्येने बेरोजगार कामाच्या प्रतीक्षेत शहरात येतात. कष्ट करण्याची, वाटेल ते काम करण्याची तयारी असूनही कोणी काम देतं का काम, अशी आर्त हाक नांदेडहून वाळूज औद्योगिक परिसरात मारुती हनवतेसारख्या अनेकजण देत आहेत. औद्योगिक परीसरात हे चित्र चिंतीत करणारे आहे. एकंदरीत या कष्टकऱ्यांचे चेहरे काम नाही तर दाम नाही, याची आठवण करून देतात.

चार दिवसांपासून घरून रोज डबा घेऊन येत आहे. मजूर अड्ड्यावर काम मिळेल या आशेने रोज दुपारी दोनपर्यंत थांबूनही शेवटी निराश होऊन रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याचे साईनाथ चव्हाण यांनी सांगितले. कामाच्या शोधार्थ आलेले शेकडो मजूर रांजणगाव शे. पू. येथील फाट्यावर दिसून आले, त्यापैकी काहींनी चार दिवसांपासून घरून रोज डबा घेऊन येतो; मात्र हाताला काम मिळत नसल्याचे सांगितले.

अड्ड्यावर काम मिळेल या आशेने रोज दुपारी दोनपर्यंत थांबूनही शेवटी निराश होऊन



### खर्चाची जुळवाजुळव करताना होते दमछाक

घराबद्दल विचारले असता या तरुणांनी सांगितले, सध्या वाळूज, घानेगाव, वडगांव, कमळापूर, पडेगाव, जोगेश्वरी, पंढरपूर, रांजणगाव आदी परिसरात, झोपडपट्टीत आम्ही दहा बाय दहाच्या घरामध्ये राहतो. काहींचे आई-वडील गावाकडेच राहतात. उत्पन्नाचे साधन नाही. शेती नाही. कुटुंबाची उपजीविका भागविण्यासाठी गाव सोडून शहराकडे आल्याचे त्यांनी सांगितले. घरभाडे, किराणा, भाजीपाला, दवाखाना या खर्चाची जुळवाजुळव करताना दमछाक होते.

रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याचे रवी लाहाडे याने सांगितले. बीड, सिल्लोड, नांदेड, विदर्भ तसेच पराराज्याहून आर्थिक संकट ओढावल्याने, गावाकडील दुष्काळी परिस्थिती, कारखान्यांचा अभाव, पाण्याचे संकट अशा अनेक कारणांमुळे काही तरुणांनी शहराकडे रोजी रोटीसाठी वाट धरली. उदरनिर्वाहासाठी कामाच्या शोधार्थ तसेच कुटुंबाची गुजराण करण्यासाठी वाळूज औद्योगिक परीसर गाठल्याचे त्यांनी सांगितले. हे सांगत असतानाच काहींच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. राज्याच्या कानाकोपऱ्यांतून रोज अनेक जण शहराची वाट पकडतात. तासनतास प्रतीक्षा करूनही हाताला काम नाही. राज्याच्या कानाकोपऱ्यांतून तसेच परप्रांतीय मजूर मोठ्या संख्येनेही शहराच्या विविध भागात आले आहेत. रोजगार मिळावा म्हणून या अड्ड्याचा आधार घेतात. यातील अनेकजण अशिक्षित असल्याने रोजगार मिळावा, म्हणून येथील मजूर अड्डयांचा आधार घेतात. काही मजूर अड्डयावर तासनतास प्रतीक्षा करूनही हाताला काम मिळत नसल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे.

दुचाकीवरून कोणी आल्यास त्याच्या भोवती सर्व घोळका करतात. काम मिळेल अशी आशा लागते. यामध्ये पुरुष मजुराला ५०० ते ७०० रुपयांपर्यंत मजुरी मिळते. या पेक्षा कमी मजुरी काम करण्याचीही त्यांची तयारी असते. आठवड्यातील सात दिवस हे

### काम मिळण्याची शाश्वती नाही

सकाळी आठ वाजेपासून काही तरुण घरून मिळेल तो जेवणाचा डबा घेऊन मजूर अड्डयावर काम मिळवण्यासाठी रोज येऊन बसतात. काम मिळेलच याची शाश्वती नाही. मिळेल ते काम करण्याची तयारी या तरुणांनी बोलून दाखविली. रोजगार मिळविण्यासाठी शहरात दाखल झालेल्या काही तरुणांवर याची वेळ आली आहे.

मजूर अड्ड्यावर येतात, मात्र तीन किंवा चार दिवसच त्यांना काम मिळते. कधी कधी दुपारच्या चार वाजेपर्यंत काम मिळेल म्हणून वाट पहावी लागते. कधी कधी आणलेले जेवण इथेच खाऊन घरी जावे लागत असल्याचेही त्यांनी सांगितले.

**बऱ्याच वेळा कामाचा मोबदला मिळत नाही**

औद्योगिक परिसरात या अड्ड्यावरून काम करण्यासाठी काही कारखानदार हे ठेकेदार काम करण्यासाठी घेऊन जातात काम झाल्यानंतर मात्र पैसे देण्याच्या कारणावरून अनेक वेळा वादळी करतात यावेळी बऱ्याचशा कामगारांनी मारहाणी करण्यात आल्याची अनेक कामगारांनी बोलून दाखवले.

## बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये विद्यार्थांना स्नेहभोज

तभा वृत्तसेवा बिडकीन दि २७ जुलै शिक्षण विभागाच्या आदेशानुसार ब्ल्यू व्हॅली इंग्लिश स्कूल ता पैठण शाळेमध्ये शिक्षण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत विविध कार्यक्रमांचे शाळेमध्ये आयोजन करण्यात येत आहेत. आज दि.२७ जुलै शनिवार रोजी सेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूल शाळे मध्ये सर्व विद्यार्थ्यां साठी स्नेहभोजाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतील सर्व शिक्षकांनी एकत्र



येऊन या स्नेहभोजनाचे आयोजन केले होते या उपक्रमास शाळेच्या मुख्यध्यापिका.सविता तोतला व शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांची उपस्थिती होती. शाळेतील विद्यार्थ्यांकरिता स्वादिष्ठ जेवनाचे आयोजन केले असता विद्यार्थांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसुन येत होता.इको क्लब योजनेअंतर्गत प्लांट फॉर मदर या उपक्रमात मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत झाडांची लागवड केली.

शिक्षण विभागाच्या आदेशानुसार शाळांमध्ये प्रभातफेरी, पोस्टर मेकिंग,विद्यांजली पोर्टलची माहिती देने व त्यावर नोंदनी करने व स्नेहभोज असे अनेक उपक्रम राबवण्यास सांगितले आहेत. शाळेने प्रत्येक उपक्रमात मुलांना सहभागी करून त्यांच्यातील विविध गुण व कौशल्यांना वाव मिळण्याकरिता संधी उपलब्ध करून दिली.

-सौ.सविता सतिश तोतला
(मुख्यध्यापिका)

## फारोळा ग्रामपंचायत येथे मुख्यमंत्री लाडकी बहीण लाभार्थी महिलांचा कॅम्प

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. २७ महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी अनेक योजना राबविण्यात येत असून यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली असून या योजनेमधील लाभार्थी महिलांना प्रत्येक महिन्यात १५०० रुपये देण्यात येणार आहे या योजनेची नोंदणी पैठण तालुक्यातील फारोळा ग्रामपंचायत येथे आज दि. २६ जुलै रोजी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लाभार्थी महीलांना ग्रामपंचायत मध्ये बोलुन कॅम्प घेण्यात आला.व



लाभार्थी महीलांचे ऑफलाईन व ऑनलाईन फार्म भरून घेण्यात आले.फॉर्म भरणे चालू असुन या योजनेचा जास्तीत जास्त लाभार्थी महिलांनी लाभ घेण्यात यावा व या योजने पासून लाभार्थी महीला वंचित रहाणार नाही असे सरपंच सलीम पठाण,व ग्रामसेविका आशा तुपे यांनी सांगितले या कॅम्पमध्ये लाभार्थी महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे. यावेळी .ग्रामसेविका आशा तुपे,सरपंच सलीम पठाण, उपसरपंच-शितल चाव्हरे,कमल गोरे,पल्लवी गोरे,सरला पोपळघट,विष्णू पोपळघट,तमीजाबी पठाण, इलियास पठाण, मीरा हाडे,रेखा इंदापूरे,गायत्री तुपे,कांचन बिडकर,मीना पवार,कोमल निकम,आशा वर्कर्स मीनाक्षी धुमाळ,अनीता पटारे,अशोक गोरे,रविंद्र गोरे,संदिप चाव्हरे,अहेमद पठाण, राधा गोरे,सुनीता धुमाळ,इरफाना पठाण,शाईन पठाण, मनिषा गायकवाड,दिलीप गोरे,गणेश गायकवाड,तेजस जाधव,संजय धुमाळ,रविंद्र पवार,मंगेश धुमाळ आदि गावकरी तसेच लाभार्थी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## बिडकीन येथे लंबोदर गणेश मंदिर व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे जागेचे भुमीपुजन संपन्न

तभा वृत्तसेवा


बिडकिन दि २५ जुलै पैठण तालुक्यातील बिडकीन.येथील सोनार गल्ली परिसरात लंबोदर गणेश मंदिर व स्वातंत्र्यसेनानी आझाद हिंद सेनेचे संस्थापक नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे जागेचे भुमीपुजन सोहळ्याचे आज दि २४ बुधवार रोजी आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती ह.भ.प.देवनारायण शरणजी महाराज,शिवराज भुमरे सरपंच ,पाचोड , सरपंच अशोक धर्मे, स्वातंत्र्यसैनिक रंगनाथ आप्पा हिवाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा भुमीपुजन सोहळा संपन्न झाला.लंबोदर गणेश मंदिर व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन सुभाष डुबे व पत्नी वैशाली सुभाष डुबे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी किसन तोतला,माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, मोहन हिवाळे,रमेश गवारे, संतोष गव्हाणे, धर्मराज



शेटे, सुनिल शेटे,राजू डुबे,राजू गवारे,सतिष गायकवाड, गणेश देशमाने,अक्षय गवारे,मधुकर सोकटकर, रमेश शिंदे, अविनाश राठोड,शिवाजी गव्हाणे, सुनील धुत , अंकुश धर्मे, बबन ठाणगे, दिगंबर कोथिंबीरे,भगवान सर्जे, डॉ.दीपक गायकवाड, डॉ. गणेश शिंदे, राजू वैद्य, दिलीप देवळाणकर, संतोष शिंदे, नितीन राऊत,निकेश राऊत,राम राऊत, बाप्पू खराडकर,आदींसह उपस्थिती होती

## अद्यावत बांधकाम साहित्याचा वापर केल्यास वेळ आणि पैसा यांची बचत होईल - ताहेर लोखंडवाला

नगर : बांधकाम क्षेत्रात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात बदल होत चालले असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत बांधकाम संदर्भात नवनवीन उत्पादने तयार होत आहे, याची माहिती आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स सभासदांना होणे गरजेचे असून त्यांच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत चांगल्या वस्तू पोहोचवण्यात येतील, त्यातून शहराच्या सौंदर्यकरणात भर पडेल, अद्यावत बांधकाम साहित्याचा वापर केल्यास वेळ आणि पैसा यांची बचत होऊन उत्कृष्ट कन्स्ट्रक्शन शक्य होईल एव्हरेस्ट इंडस्ट्रीजने नव्याने बाजारात आणल्यात यामध्ये



पार्टीशन वॉल, ग्रीड सीलिंग, हेवी ड्युटी बोर्ड, रेडी मेड वॉल, डिझायनर सीलिंग, टेक्चर वॉल , सिमेंट वुड प्लांक अश्या विविध नवीन उत्पादनांची माहिती एव्हरेस्ट कंपनीचे झोनल हेड ताहेर लोखंडवाला यांनी दिली.

आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असो अहमदनगरच्या सभासदांसाठी एव्हरेस्ट इंडस्ट्रीजने नव्याने बाजारात आणलेल्या विविध उत्पादनाचे सादरीकरण आयोजित केले होते. यावेळी रिजनल सेल्स मॅनेजर आकांक्षा सेटी, असी सेल्स मॅनेजर निलेश जगताप, टेक्निकल वेस्ट झोन हेड श्रेयांस पाटील, नगर मधील डीस्ट्रिब्यूटर एस एस इंटरनॅशनलचे सुनिल रहाणे, संजय शिंदे , महेश मुंडे, नामदेव मुरकुटे, जितेंद्र शर्मा, सुनिल रहाणे, महेश मुंढे,संस्था उपाध्यक्ष आदिनाथ दहिफळे, सचिव प्रदिप तांदळे, वैभव फिरोदिया, सुनिल औटी, संकेत पादीर, मयुरेश देशमुख, उदय तरवडे, यश शहा, वैभव देशमुख, संदीप काकानी, शिरीष कुलकर्णी, जितेश सचदेव, अजित माने, अशोक मवाळ, प्रकाश जैन, संजय पवार, देवेंद्रसिंग वधवा, प्रणाली तांदळे, पायल शहा आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स,भु,बिडकीन येथे कारगील विजय दिनानिमित्त अभिवादन रॅली



बिडकीन दि २७ जुलै पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे कारगील विजय दिनानिमित्त एन.सी.सी विद्यार्थी यांनी रॅली काढून शहिद जवानांना अभिवादन केले.यावेळी प्रशालेचे उपमुख्याध्यापक युवराज पाडळे पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा एन.सी.सी. अधिकारी बाबासाहेब सोकटकर यांनी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन केले. उपमुख्याध्यापक युवराज पाडळे यांनी विद्यार्थ्यांना कारगील विजय दिनानिमित्त सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन बाबासाहेब सोकटकर यांनी केले . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एन.सी.सी.चे सर्व छात्र यांनी प्रयत्न केले

## आनंदी वास्तू प्रोडक्शनचे 'स्वामी शक्ती' भक्तीगीत भेटीला

छत्रपती संभाजीनगर : आनंदी वास्तू प्रोडक्शनच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त स्वामी शक्ती हे भक्तीगीत आनंद पिंपळकर यांच्या 'आनंदी वास्तू' या यूट्यूब चॅनलवर प्रदर्शित झाले आहे. एखाद्या शॉर्टफिल्म प्रमाणे गीताचे चित्रण करण्याची परंपरा व पद्धत आनंदी वास्तू प्रोडक्शनने केली असून गाण्याच्या माध्यमातून कथा सादरीकरण, गीतातून चित्रपटाची भव्यता दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्वामी शक्ती हे गीत स्वामी भक्तांना ही पर्वणी असून योगेश तपस्वी यांच्या आवाजातील, हृदयापर्यंत पोहोचणाऱ्या या गाण्याला तेजस सालोखे यांनी संगीत दिले आहे. याचे चित्रीकरण नुकतेच पुणे येथे झाले. स्वामी शक्ती या भक्तिमय गाण्यांमध्ये सामाजिक संदेश देण्यात आला आहे. अन्यायग्रस्त मुलीला न्याय मिळवून देण्याचे काम करणाऱ्या ६५ वर्षीय जोशी काका व जोशी काकूंची ही कथा आहे. पांढरपेशा पापभिरू रिटायर्ड साधा माणूस जीवनात ठरवलं तर काय करू शकतो. समाज बदलण्याची ताकदही ठेवू शकतो. सामान्य माणसाची असामान्य ताकद काय आहे हे या गीतामधून आपल्याला पहायला मिळते. कर्तुत्वाला, नेतृत्वाला आणि दातृत्वाला जर श्री गुरूची साथ असेल तर कोणतेही शिवधनुष्य तो लीलया पेलू शकतो असा संदेश या गीतामधून देण्यात आलेला आहे.

## बीजेपीचे निवेदन येताच वाळू विषय कारवाई



पैठण दि २६ :- अवैध धंदे तसेच वाळू संदर्भात पैठण भारतीय जनता पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षकांना निवेदन देताच जुने कावसण गोदावरी पात्रात अवैध वाळू उपसा प्रकरणी अप्पर जिल्हाधिकारी यांच्या पथकाने कारवाई करत तीन ट्रॅक्टर व दोन लोडर ताब्यात घेतले आहे. त्याच प्रमाणे शिष्टमंडळा तर्फे तालुक्यात शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यासाठी टाळाटाळ करणाऱ्या बँकांवर कारवाई करावी अशी मागणी व्यवस्थापक, अग्रणी बँक संभाजीनगर यांच्याकडे करण्यात आली आहे. यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष लक्ष्मण औटे, जिल्हा सहकार आघाडीचे अध्यक्ष तुषार भाऊ शिसोदे, सतीश आहेर, सिद्धार्थ परदेशी, भाऊसाहेब बोरुडे, गजानन बोहरा, सुरेश गायकवाड, अब्दुल गणी बागवान, एकनाथ जाधव, सुरज घुले, योगेश कुलथे इत्यादी उपस्थित होते.

## काव काव नावाची शॉर्ट फिल्म आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अव्वल



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - नुकतेच जर्मनी मध्ये झालेल्या इंडियन फिल्म फेस्टिवल स्टुटगार्टमध्ये डॉ.स्वानंद वाघ ह्यांच्या शॉर्ट फिल्मला यश मिळालं आहे. मेंस्टुएशन ह्या सेनसिटिव्ह विषयावर बनवलेल्या शॉर्ट फिल्मला विदेशी लोकांनी पसंती दाखवली. आतापर्यंत तब्बल ५० हून अधिक पुरस्कार ह्या शॉर्टफिल्मला मिळाले आहे. ज्यात मुंबई फिल्म फेस्टीवल, कोलकाता फिल्म फेस्टीवल, दादा साहेब फाळके पुरस्कार, मद्रास फिल्म फेस्टिवल असे अनेक पुरस्कार समाविष्ट आहे. केवळ भारतातचं नाही तर ह्या शॉर्टफिल्मला आंतरराष्ट्रीय यश सुद्धा भेटलं आहे. डॉ.स्वानंद वाघ मुळात डेटिस्ट असून त्यांनी आपले शिक्षण वाय.एम. टी डेटंल कॉलेज खारघर नवी मुंबई येथून केले आहे. परंतु डेटिस्टचा अभ्यास करत असताना त्यांना फिल्म मेकिंगची आवड लागली. फिल्म मेकिंगमध्ये कुठलं ही शिक्षण न घेता त्यांनी यूट्यूब वरून व्हिडीओ पाहून फिल्म मेकिंग शिकली. अखेर २०२२ च्या अखेरीस त्यांनी काव काव नावाची शॉर्टफिल्म बनवली, ज्यात एका मुलाची आपल्या आईला भेटण्याची तळमळ व्यक्त केली आहे. ही शॉर्ट फिल्म अतिशय कमी बजेट मध्ये बनली असूनही त्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ओळख मिळालं हे कौतुकच. नवल म्हणजे ह्या शॉर्टफिल्म मधले बहुतांश कलाकार हे कलाकार नसून गावातले साधी लोक होती. या शॉर्ट फिल्मचं दापोली मध्ये शूटिंग झालं असून, मुंबई मध्ये त्यांनी ह्याची एडिटिंग केली.

## राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत विरेन वाघ जिल्ह्यात दुसरा



नाचनवेल: दि.२७.जुलै-महाराष्ट्र शासन मान्य एमटीएस ऑलंपियाड राज्यस्तरीय स्पर्धा परिक्षा यांच्या मार्फत जानेवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या एमटीएस ऑलंपियाड परीक्षेत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा नाचनवेल ता.कन्नड शाळेतील कु. विरेन अजयकुमार वाघ हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून द्वितीय क्रमांकाने तसेच महाराष्ट्र राज्यातून नवव्या क्रमांकांने उत्तीर्ण झाल्याबद्दल सर्वच स्तरातून त्याचे कौतुक करण्यात येत आहे. या यशासाठी वर्गशिक्षिका श्रीमती माळी मॅडम तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी प्रयत्न केले. विरेन वाघ हा जि.प.प्रा. शा.वाकद केंद्र शेलगाव ता.कन्नड शाळेतील प्राथ.शिक्षक श्री. अजय रामदास वाघ यांचा मुलगा आहे. यावेळी शालेय समिती अध्यक्ष गणेश राजपूत श्रीम.नलिनी गोसावी ,श्रीम. आशा माळी ,श्रीम अभिलाषा लोकरे ,श्री. गणेश जगताप, राजू शेलार, आदींनी या विद्यार्थ्याचे कौतुक करीत सन्मान केला.

## उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप



सोयगाव,दि.२७ जुलै : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते,एकनाथ सपाटे,दिनकर शिपल्कर,शेषराव पाटील, विठ्ठल बोबडे,गजानन अंभोरे, संतोष बगाड तसेच मुख्याध्यापक व्ही.एल.राठोड,बी.जी.गायकवाड, एम.डी.मुठाळ,ए.आर.चव्हाण,जी. के.गवई, व विद्यार्थी हजर होते.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## काजळा येथे श्री सद्गुरू रामानंद महाराज ग्रंथाचे ४ ऑगस्टला प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै -**

तालुक्यातील काजळा येथे श्री सद्गुरू ब्रम्हचारी रामानंद महाराज यांच्या जीवन चरित्रावरील ग्रंथाचे प्रकाशन रविवार दि.४ ऑगस्ट रोजी दु. ४ वा. करण्यात येणार आहे. काजळा येथील रामानंद महाराज मठामध्ये पंढरपूर येथील श्री विठ्ठल - रुक्मिणी मंदीर समितीचे सहअध्यक्ष, सुप्रसिद्ध किर्तनकार हभप गहीनीनाथ महाराज औसेकर यांच्या शुभहस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे.सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे यांची उपस्थिती राहणार आहे. राजुरी (ता. धाराशिव) येथील प्रगतशील शेतकरी व श्री राम ानंद महाराजांचे भक्त हरीदास उर्फ नाना वाघमोडे यांनी हा ग्रंथ लिहीला आहे. या ग्रंथ प्रकाशन सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिध्द कीर्तनकार हभप नवनाथ महाराज चिखलीकर, जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष धनंजय रणदिवे, श्री रामानंद महाराज देवस्थान समितीचे अध्यक्ष प्रदीप शेळके यांची उपस्थिती लाभणार आहे. लेखक श्री वाघमोडे यांनी सांगितले, सद्गुरू श्री रामानंद महाराज हे काही वर्षे राजुरी (ता. धाराशिव) येथील आमच्या शेतामध्ये वास्तव्यास होते. महाराजांची आमचे कुटुंबीय तसेच शेतातील सालगडी सेवा करीत असत. या ग्रंथाचे प्रकाशन करून रामानंद महाराजांच्या हजारो, लाखो भक्तांसाठी हा ग्रंथ उपलब्ध करून देण्यात खूप आनंद होत असल्याचे वाघमोडे यांनी म्हटले.



## संक्षिप्त वृत्त...



### कारगील विजयाचे रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त शहिद विरांना अभिवादन

**उमरगा, दि.२७ जुलै -**

शहीद वीर पुत्र कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी यांना श्री शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे कारगील विजयी दिना निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कारगील विजयी दिन रौप्य महोत्सवी वर्षानिमित म हाविद्यालया पासुन बसस्थानाका पर्यंत उमरगा शहरामध्ये रॅली आयोजित करण्यात आली. त्यानंतर महाविद्यालयात कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन एनएसएस विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.गिरीधर सोमवंशी यांनी कॅडेटस्ना कारगील विजयीदिनाचे महत्व सांगुन युद्धात ज्या विरांनी बलिदान दिले त्यांची शौर्यगाथा सांगितली. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांची उपस्थिती होती. तसेच उप्राचार्य डॉ विलास इंगळे, डॉ.पदमाकर पिटले, डॉ.श्रीशैल्य तोडकर, डॉ.सतिश गावित, डॉ.बी.जी.माने तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, कॅडेटस्, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन डॉ.ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले व आभार डॉ.समाधान पसरकले यांनी मानले. या कार्यक्रमाचे आयोजन ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर येथील कर्नल हेमंत जोशी, ए.ओ.लेफ्टनंट कर्नल वाय.बी.सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

### प्राचार्यपदी डॉ.सुभाष राठोड

**नळदुर्ग, दि.२७ जुलै -**

कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी डॉ.सुभाष राठोड यांची विद्यापीठ प्रशासनाकडुन अधिकृत नियुक्ती झाल्यामुळे त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्या देण्यात आल्या. तत्कालीन प्राचार्य डॉ.संजय कोरेकर यांचा कार्यकाळ संपल्यानंतर बालाघाट शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी डॉ. सुभाष राठोड यांची महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यपदी नियुक्ती केली होती. या कालावधीत राठोड यांची काम करण्याची तळमळ पाहुन संस्थेने विद्यापीठ प्रशासनाकडे कायम स्वरूपी प्राचार्याची नेमणुक करण्याचा प्रस्ताव पाठवुन सदरील पदाची मुलाखत घेऊन कायमस्वरूपी प्राचार्याची नेमणुक करावी अशी मागणी केली होती. त्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाने काल महाविद्यालयात प्राचार्य पदाच्या मुलाखतीस आलेल्या प्राचार्यांच्या मुलाखती घेतल्या व डॉ. सुभाष राठोड यांची नियुक्ती केली. कारगिल विजयी दिनाचे औचित्य साधुन महाविद्यालयाच्या वतीने सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थित नुतन प्राचार्य डॉ.सुभाष राठोड यांचा कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील, वनस्पती विभाग प्रमुख डॉ. विजय सावंत, नॅक समन्वयक डॉ.शिवाजी घोडके, प्रा. आशिष तिडके यांनी सत्कार केला. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.पांडुरंग पोळे यांनी केले तर आभार डॉ. सचिन देवधरे यांनी मानले.

### सोलर कंपनीने शेतात लावले अनधिकृत लाईट पोल

**तुळजापूर, दि.२७ जुलै -**

तालुक्याती मालुंब्रा येथिल शेतकरी रामदास महादेव वडणे यांची मसला (खुर्द) येथील गट क्रमांक-३७४ मधील ३ हेक्टर ५१ आर शेती म ालकीची असताना, सोलर कंपनीने त्यांना कोणताही पूर्वकल्पना दिली नाही व विजेचे खांब उभा केले. यामुळे यांच्या शेतातील पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. खांब उभारलेले पाहून त्यांनी तात्काळ सोलर कंपनीचे कर्मचारी मुलांनी व पटेल यांना भेटून माहिती दिली. त्यांच्याशी ही फोनवरून संपर्क साधून खांब हटवण्याची विनंती केली. मात्र त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. यामुळे या शेतकऱ्यांने तुळजापूर तहसिलदार यांना निवेदनाद्वारे कठोर कारवाई करून न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.



### पारडी शाळेत कारगिल दिन साजरा

**वाशी, दि.२७ जुलै -**

जि.प.प्रा.शाळा पार्डी येथे शुक्रवारी कारगिल विजय दिन उत्साहात साजरा करण्यात आला. जि.प.प्रा.शाळा पारडी येथे कारगिल विजय दिनानिमीत्त कारगिल युध्दात अतुलनीय कामगिरी करणारे ज्यांचा उल्लेख त्यांचे सहकारी शेर शहा असा करत होते. ते भारमातेचे सुपुत्र परमवीर कॅप्टन विक्रम बत्रा यांच्याविषयी माहिती दिली. तसेच कारगिल युध्दाचा एक प्रसंग ऐकवला. ही माहिती मुले अगदि मंत्रमुग्ध होऊन ऐकत होती. शेवटी विद्यार्थ्यांनीच भारत माता की जय असे म्हणत जयजयकार केला. यानंतर विद्यार्थ्यांची कारगिल युध्दाचा प्रसंग कसा असेल यावर अधारीत चित्रकला स्पर्धा व निबंधलेखन घेतले. विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक नागटिळक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी मु.अ. नागटिळक यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका, शा.पो.आ. स्वयंपाकी, विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून जिल्ह्याच्या विकासाला चालना : पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत

## परंडा तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै -**

जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून आहे.केवळ पावसाच्या पाण्यावर इथला शेतकरी अवलंबून न राहता त्याला बारमाही सिंचनाची व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. यासाठी उजनी प्रकल्पातून ७ टीएमसी पाणी लवकरच उपलब्ध होणार आहे. शेतकरी यामधून नगदी पिकाकडे वळून बारामाही पिके घेतील.तसेच शेतीपूरक व्यवसाय व कृषी प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यात येत आहे. असे प्रतिपादन पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी केले.

२६ जुलै रोजी परंडा तालुक्यातील वाटेफळ येथे विविध विकास कामे केल्याबद्दल ग्राम स्थांच्या वतीने आयोजित सत्कार कार्यक्रमात प्रा.डॉ. सावंत बोलत होते.यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत,माजी जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती दत्तात्रय साळुंखे,परांडा पंचायत समितीचे माजी सभापती गौतम लटके व परांडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राहुल डोके यांची प्रमुख उपस्थिती होती.



पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत म्हणाले, परंडा,भूम व वाशी तालुक्यातील रस्त्यांसाठी विविध योजनेतून निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे मतदारसंघातील एकही रस्ता आता निधीअभावी शिल्लक राहणार नाही. या तिन्ही तालुक्यात औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी तीन ठिकाणी एमआयडीसी मंजूर केली आहे. एम आयडीसीसाठी लागणारी भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली आहे.

येत्या गुढीपाडव्यापर्यंत उजनी प्रकल्पातून सात टीएमसी पाणी सीना कोळेगाव प्रकल्पात येणार आहे. त्यामुळे हा परिसर सुजलाम सुफलाम होऊन येथे शेतीपूरक उद्योग सुरू होतील आणि यामधून अनेकांच्या हातांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.शेतकरी पाण्याच्या व्यवस्थेतून समृद्ध होण्यास मदत होईल असे प्रा.डॉ. सावंत म्हणाले.

जिल्हा मागास असल्याम ुळे केंद्राने जिल्ह्याचा समावेश आकांक्षीत जिल्ह्यात केला आहे. आकांक्षीत जिल्ह्याचा लागलेला हा डाग आपल्याला पुसायचा असल्याचे सांगून प्रा.डॉ.सावंत पुढे म्हणाले, शिवजल क्रांतीच्या माध्यम ातून भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली आहे.सिंचनाची सुविधा निम र्ाण होण्यास मदत झाली. नदी व नाले खोलीकरणाचे काम शिवजल क्रांतीतून झाले.

रस्ते,पांदण रस्ते व अंतर्गत रस्त्यांसाठी ५० टक्के निधी जिल्हा नियोजन समितीतून या तालुक्यासाठी दिला आहे. अनेक योजना पुनर्जीवित केल्या आहे.बंद असलेली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व जिल्हा दुग्ध संघ लवकरच पुनर्जीवीत करण्यात येणार आहे. दोन अडीच वर्षाच्या कालावधीत मतदारसंघातील रस्त्यांसाठी ७०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे.या कालावधीत भूम,परंडा आणि वाशी या तालुक्यात पावणेदोन हजार कोटी रुपयांची कामे होत आहे असे प्रा.डॉ.सावंत यांनी सांगितले.

तांदूळवाडी- पाचवड येथील विकास कामांचे लोकार्पण

पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी परंडा तालुक्यातील तांदुळवाडी येथे तांदुळवाडी - पाचवड गावातील विविध विकास कामांचे लोकार्पण केले. यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत, जिल्हा परिषदेचे माजी पशुसंवर्धन व कृषी समिती सभापती दत्तात्रय साळुंखे, परंडा पंचायत समितीची माजी सभापती गौतम लटके व परंडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राहुल डोके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते ५ कोटी ४३ लाख रूपये निधीतील खैरी नदीवरील पुलाचे,१ कोटी १० लक्ष रुपयातून तोतरमोडी ओढ्यावरील बंधाऱ्याचे,४ कोटी रुपयांच्या निधीतून देऊळवाडी-तांदुळवाडी रस्ता डांबरीकरण, जन सुविधेच्या १० लक्ष निधीतून दुरुंदे गल्लीत सिमेंट रस्ता, १० लक्ष रुपये निधीतून देवीच्या मंदिरासमोर सभा मंडप, २५/१५ योजनेतून ५ लाख रुपये निधीतून हवालदार वस्ती येथे सिमेंट रस्ता, पाचवड येथे २५/१५ योजनेतील ५ लाख रुपये निधीतून सिमेंट रस्ता व पाचवड येथे १० लक्ष रुपये निधीतून पुलाच्या कामाचे उद्घाटन करण्यात आले. तांदूळवाडी येथील प्रतिष्ठित नागरिक भालचंद्र खरतडे व ग्रामस्थांनी गावाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देऊन दोन्ही गावात विकास कामे केल्याबद्दल पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांचा सत्कार केला.

यावेळी आयोजित कार्यक्रम ात बोलताना पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत म्हणाले,जवळपास या दोन्ही गावात ११ कोटी रुपयांच्या निधीतून विकास कामे करण्यात आली आहे. या दोन्ही ग्रामस्थांच्या आणखी काही समस्या असतील तर त्या नक्की सोडविण्यात येतील. ७०० किमी नाल्याच्या खोलीकरणाची कामे कंपन्यांच्या उत्तरदायित्व निधीतून करण्यात आली आहे.म राठवाड्यातील वॉटर ग्रीडसाठी १६ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. याचा लाभ जिल्ह्याला देखील मिळणार आहे. सीना-कोळेगाव प्रकल्पाचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे.हा प्रकल्प पूर्ण होताच मतदारसंघात सिंचनाच्या मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध होतील.

मतदारसंघातील प्रत्येक गावात सरासरी ५० लक्ष रुपये निधी विविध विकास कामांसाठी दिला आहे. शेतकरी समृद्ध तर युवक स्वावलंबी झाला पाहिजे या दृष्टीने विकासाचे नियोजन आहे असे ते म्हणाले. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करून जिल्हा विकसित करण्यात येईल असे सांगून प्रा.डॉ.सावंत पुढे म्हणाले, शेती पिकाला योग्य किंमत आणि शेतीवर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात येतील. विविध विकास कामांच्या माध्यमातून जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलण्यात येईल.

## मांजरा शुगर (कंचेश्वर) येथे मील रोलर पुजन व वृक्षारोपण संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव/मंगरुळ, दि.२७ जुलै -**

लातूर, धाराशिवसह राज्यात आणि देशभरात सहकार महर्षी मा.दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनामुळे लौकिक प्राप्त केलेल्या व नुकताच मांजरा परिवारात समाविष्ट झालेल्या म ांजरा शुगर (कंचेश्वर) कारखान्यात २०२४-२५ हंगाम सुरू होण्याच्या दृष्टीने मील रोलरचे पुजन विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, आ.धिरज विलासराव देशमुख व रीड लातूर उपक्रमाच्या संस्थापक दीपशिखा धिरज देशमुख, वंश देशमुख, दिवीयाना देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. यासोबतच कारखाना परिसरात वृक्षारोपण देखील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी जागृती शुगरचे व्हा.चेअरमन लक्ष्मणराव मोरे, रेणाचे चेअरमन सर्जेराव मोरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, दिपक जवळगेकर, मुकुंद डोंगरे, धिरज पाटील, विनोद पाटील, माजी जि.प.अध्यक्ष संतोष देशमुख, रेणाचे व्हा.चेअरमन अनंतराव देशमुख, जिल्हा बँक संचालक राजकुमार पाटील, अनुप शेळके, संभाजी रेड्डी, मांजरा कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडीत देसाई, जागृतीचे व्यवस्थापक गणेश येवले, जिल्हा बँक कार्यकारी संचालक एच जे जाधव, मांजरा शुगरचे जनरल मॅनेजर सतिश वाकडे, जनरल मॅनेजर फिल्ड अँड कृषी अधिकारी रामानंद कदम, टेक.जनरल मॅनेजर अजित कदम, चिफ केमिस्ट बाळासाहेब पेठे, मुख्य शेतकी अधिकारी नारायण धांडे, डिस्टलरी मॅनेजर उत्तम हायकर, कार्यालयीन अधिकारी अभय तिवारी, सिव्हील इंजिनीअर गोकुळ थावरे, परचेस ऑफीसर संतोष जाधव आदींची उपस्थिती होती. मागील गळीत हंगामात कारखान्याने गाळपास आलेल्या ऊसाला १० दिवसात संपूर्ण एफआरपीचे एकरकमी ऊस बील देवून शेतकरी बांधवांच्या मनात विश्वास निर्माण केला असल्याने गळीत-हंगाम २०२४-२५ मध्ये आपला ऊस गाळपासाठी मांजरा शुगर (कंचेश्वर) कडे देणार असल्याचा निर्धार ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी केला असल्याचे दिसून येत आहे.



## गजानन महाराज पालखीचे भूम शहरात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२७ जुलै -**

पंढरपूरहून आषाढी एकादशी यात्रा करून शेगावकडे परतीच्या मार्गाने निघालेल्या श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे दि.२५ जुलै रोजी सायंकाळी सहा वाजता शहरात आगमन झाले. यावेळी माजी नगराध्यक्ष संजय गाढवे व संयोगिता गाढवे यांच्यासह नगरपरिषद कर्मचारीच्या वतीने व गजानन महाराज व्यापारी सेवा मंडळाच्या वतीने पालखीचे स्वागत करण्यात आले.

या पालखीचा शहरातील कुंथलगिरी रोड वरील श्री संत गजानन महाराज मंदिरात मुक्काम व जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. हा पालखी सोहळा आषाढी यात्रेसाठी शेगावहून पंढरपूर कडे विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनाला जातो. पालखी पंढरपूर वरून भूम मधून परतीच्या मार्गाने जाते. या पालखी सोहळ्यात ७०० वारकरी असून त्यामध्ये २५० भगव्या पताका खांद्यावर घेऊन तर श्वेतवस्त्रधारी २५० टाळकरी व २०० सेवेकारी असतात. यंदा पालखीचे ५५ वे वर्ष होते.

श्री ची पालखी भूम शहरात शिवाजीनगर मार्गाने दाखल होताच भक्ताकडून श्रींच्या पालखीचे स्वागत करण्यात आले. सायंकाळच्या सुमारास हा पालखी सोहळा शहरात आला. त्यावेळी शहरातील प्रमुख रस्त्यावरून गजानन महाराज मंदिरात मुक्काम होतो.

तेथे भाविक भक्तांनी दर्शनसाठी गर्दी केली होती. तसेच भूम शहरात ठिकठिकाणी शहरवासी यांच्या वतीने व व्यापाऱ्यांच्या वतीने या पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले.

दुसऱ्या दिवशी दि.२६ जुलै रोजी पहाटे आरती झाल्यानंतर सकाळी कुंथलगिरी मार्गे सरमकुंडी फाट्याकडे पालखी मार्गस्थ होते. गजानन महाराज व्यापारी संघटनेच्यावतीने वारकऱ्यांचे सर्व सोय करण्यात आली .

## लोहारा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षण सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२७ जुलै -**

लोहारा शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत भारतीय खेळाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावे यासाठी शाळेत विविध प्रकारच्या खेळाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत या सप्ताह साजरा करण्यात येत असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दि.२२ जुलै ते २८ जुलै दरम्यान शिक्षण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्य तयार केले, दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी निपुण प्रतिज्ञा म्हटली गणित खेळ व भाषिक खेळाचे आयोजन करण्यात आले, तिसरा दिवस क्रीडा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. चौथ्या दिवशी सांस्कृतिक दिवस, पाचव्या दिवस डिजिटल शिक्षणाचे फायदे सार्वत्रिक करणे आदी विविध कार्यक्रम घेण्यात आले.

### जनता दरबारात बँक अधिकाऱ्यांना पालकमंत्री तानाजीराव सावंत यांनी खडसावले

# कर्जासाठी शेतकऱ्याची आडवणूक करू नका

### लाडकी बहीण योजनेसाठी समित्या गठीत करण्याच्या सुचना तहसिलदार व बीडीओ यांनी लवकर अहवाल सादर करावा

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ जुलै -**

आरोग्य मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री परंडा भूम वाशी मतदार संघाचे आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत हे शुक्रवार व शनिवार रोजी परंडा तालुका दौऱ्यावर आले असता त्यांनी तालुकाभरात विविध विकास कामाचे भुमिपुजन व लोकार्पण केले तर दि. २७ जुलै शनिवार रोजी परंडा येथे तहसिल कार्यालयात जनतेच्या अडीअडचणी विविध प्रश्न व कामाची पूर्तता करण्यासाठी विविध कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांच्या बरोबर जनता दरबाराचे आयोजन केले होते यावेळी अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन कामाचा आढावा घेतला जनतेने केलेल्या तक्रारीचे निर्सण करण्यासाठी उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना मात्र चांगलेच फैलावर घेतले.



सर्व बँकेच्या अधिकाऱ्यांनी कर्जासाठी कुढल्याच शेतकऱ्यांची आडवणूक करू नये नसता तुमची गय केली जाणार नाही, असा सज्जड दमही दिला महावितरणच्या आधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना कामाविषयी मदत करावी त्यांची कसलीच अडवणूक करू नये तसेच कृषी तालुका कार्यालयाने शेतकर्यांची वेळेत कामे पूर्ण करावीत अशा सुचना दिल्या आहेत.

तालुक्यातील भूसंपादन कार्यालयात शेतकऱ्यांच्या कामाची लवकर पूर्तता होत नाही, अशी ओरड शेतकरी बांधवाची असुन वेळेवर अधिकारी कामे करीत नाहीत ऑफीस मध्ये गैरहजर असतात हे मंत्री महोदयांच्या निर्देशनास जनतेने आणुन दिल्याने त्या अधिकाऱ्यांची खरडपट्टी केली तर पंचायत समितीमध्ये जनतेच्या कामाच्या फाईल धुळ खात पडुन आहेत. त्याचा ही लवकर निपटारा होत नसल्याच्या तक्रारी जनतेने जनता दरबारात पालकमंत्री सावंत यांच्यासमोर मांडल्या आहेत.

बीडीओ सतत गैरहजर राहत असल्याने कामे वेळत पूर्ण होत नाहीत, असे ही सांगण्यात आले. यावेळी मंत्री सावंत यांनी संबंधीत अधिकाऱ्यांनी जनतेची काम लवकर पूर्ण करण्याच्या सुचना दिल्या तर लाडली बहिण योजनेसाठी तहसिलदार व पंचायत समिती अधिका-यांनी कामात लक्ष घालून जास्तीत जास्त महिलांचे प्रास्ताव दाखल करून घेऊन लाडली बहीण योजनेच्या सम ित्या गठीत कराव्यात अशा सुचना यावेळी जनता दरबारात दिल्या आहेत.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनिक घोष, तहसीलदार घन -शाम अडसुळ, कृषी अधिकारी लांडगे, पंचायत समीताचे नागटिळक, बँक अधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, शिवसेना जिल्हा प्रमुख दत्ता आण्णा साळुंके, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.गौतम लटके, शिवसेना ता प्रमुख आण्णासाहेब जाधव, माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर, सुभाषसिंह सदिवाल, रामचंद्र घोगरे, शिवसेना तालुका संघटक तथा संजय गांधी समिती अध्यक्ष जयदेव बप्पा गोफणे, माजी नगरसेवक रत्नकांत शिंदे, पंचायत समितीचे माजी सदस्य गुलाब शिंदे, सतिष दैन, बाळासाहेब गायकवाड आदिसह शिवसेनेचे पदाधिकारी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अग्रलेख...

# विरोधकांनी जबाबदारीने वागावे

लोकशाहीत विशेषत: संसदीय लोकशाहीत विरोधी पक्ष आवश्यक असतो. विरोधी पक्षांशिवाय लोकशाहीला पूर्णत्व प्राप्त होत नाही. सत्तापक्ष आणि विरोधी पक्ष हे संसदीय लोकशाहीच्या रथाची दोन चाके तसेच नाण्याच्या दोन बाजू म्हटल्या पाहिजेत. लोकशाहीत सत्ता संतुलन राखण्यासाठी सत्ताधारी पक्षासोबतच विरोधी पक्षही आवश्यक असतो. सरकार योग्यप्रकारे काम करत आहे की नाही, जनहिताचे निर्णय घेत आहे की नाही, यावर लक्ष ठेवणे ही विरोधकांची जबाबदारी असते. सरकारच्या चुकीच्या तसेच लोकविरोधी निर्णयावर टीका करण्याचा विरोधी पक्षांना अधिकार असतो; या अधिकाराचा विरोधी पक्षांनी जबाबदारीने वापर करणे अपेक्षित असते. पण गेल्या काही दिवसांत विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस आणि इंडिया आघाडी ज्या पद्धतीने काम करत आहे, तो एकूणच प्रकार लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या सुबुद्ध नागरिकांना चिंतेत पाडणारा आहे. विरोधी पक्षांनी सरकारवर टीका करताना आक्रमक होणे समजण्यासारखे आहे, पण विरोधी पक्षनेते राहुल गांधी ज्या पद्धतीने संसदेत आणि संसदेबाहेर वागत आहेत, गोंधळ घालत आहेत, ते पाहून 'हेचि फळ काय मम तपाला' असे म्हणण्याची वेळ त्यांना लोकसभेवर निवडून देणाऱ्या उत्तरप्रदेशातील रायबरेली मतदारसंघातील जनतेवर लवकरच येऊ शकते. वायनाडच्या जागेचा राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्यामुळे तेथील जनतेने सुटकेचा श्वास सोडला असेल. अन्यथा त्यांच्यावरही पश्चात्तापाची पाळी आली असती. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने ९९ जागा जिंकल्यानंतर काँग्रेसमध्ये एकप्रकारची मस्ती आल्यासारखे दिसत आहे. शंभरचा आकडाही आपल्याला पार करता आला नाही, याची खरं म्हणजे काँग्रेसला आणि त्यांच्या नेतृत्वाला लाज वाटायला हवी होती. पण लाज वाटणे तर दूर; पण काँग्रेसची संसदेतील आणि संसदेबाहेरील वागणूक दुसऱ्याला लाज येईल, अशी होत चालली आहे. सरकारवर टीका करण्याचा विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसचा तसेच विरोधी पक्षनेता म्हणून राहुल गांधी यांचा अधिकार कोणी नाकारत नाही. पण ही टीका तर्कसंगत आणि न्यायसंगत असली पाहिजे. पण सभागृहात राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस खासदारांची वागणूक बेताल म्हणावी अशी होत चालली आहे. त्यामुळे राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाची स्थिती 'आधीच मर्कट त्यात मद्य प्याला' अशी झाल्यासारखी कोणाला वाटत असेल तर त्याला दोष कसा देता येईल.

मोदी सरकारचा तिसरा कार्यकाळ सुरू आहे. पहिल्या दहा वर्षांत मोदी सरकारने राष्ट्रहिताचे तसेच जनतेच्या हिताचे एक-दोन नाही तर शेकडो निर्णय घेतले. गोरगरीब जनतेसाठी अनेक कल्याणकारी योजनांची सुरुवात केली. काँग्रेसला आपल्या ६० वर्षांच्या कार्यकाळात जेवढे लोककल्याणकारी निर्णय घेता आले नाही, तेवढे वा त्यापेक्षा जास्त निर्णय मोदी सरकारने या काळात घेतले. त्याबद्दल मोदी सरकारची जेवढी प्रशंसा करावी तेवढी कमी आहे. त्यामुळे मोदी सरकारवर टीका करता येईल, अशी एकही संधी गेल्या दहा वर्षांत विरोधकांना मिळाली नाही. 'न खाऊंगा न खाने दूंगा' म्हणणाऱ्या मोदींमुळे भ्रष्टाचाराचे एकही प्रकरण समोर आले नाही. काँग्रेस आणि अन्य विरोधकांचे नेमके दु:ख हे आहे. काँग्रेस सरकारच्या एकूणच सत्ताकाळात विशेषत: २००४ ते २०१४ या दहा वर्षांच्या कार्यकाळात भ्रष्टाचाराचा सगळा अनुशेष काँग्रेसच्या नेत्यांनी विशेषत: मंत्र्यांनी भरून काढला, असे म्हणायला हरकत नाही. या काळात दररोज भ्रष्टाचाराचे एकतरी प्रकरण झाले, असे म्हणायला हरकत नाही. त्यामुळे मोदी सरकारवर टीका तरी कोणत्या मुद्यावर करावी, अशी काँग्रेसची अडचण आहे. काहीच सुचत नसल्यामुळे त्यांनी सरकारला संसदेत आणि बाहेरही सरकार म्हणूनही काम करू न देण्याची भूमिका घेतली, असे दिसते. त्याचाच भाग म्हणून काँग्रेसचे खासदार संसदेत विनाकारण आक्रमक होत गोंधळ घालत कामकाज ठप्प पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. काँग्रेसच्या मागे फरफटत जाणाऱ्या विरोधी पक्षांची स्थिती यापेक्षा वेगळी नाही. मोदी सरकारने कोणताही निर्णय घेतला की त्यावर काँग्रेसचे नेते आणि प्रवक्ते तुटून पडतात. आपण जे बोलतो, जी टीका करतो, ती तर्कसंगत आणि न्यायसंगत आहे की नाही, याचेही भान त्यांना राहात नाही. फक्त सभागृहात गोंधळ घालून कामकाज ठप्प पाडणे याला त्यांचे प्राधान्य आहे. मात्र या गोंधळाकडे दुर्लक्ष करत मोदी सरकार एकामागोमाग एक जनहिताचे निर्णय घेत आहे. हे पाहून 'हाथी चले बाजार तो...भौंके हजार' याची आठवण आल्याशिवाय राहात नाही. राहुल गांधी ज्याला आक्रमकता समजतात, ती आक्रमकता नाही तर बालिशपणा आहे, पोरखेळ आहे. विरोधी पक्षनेतेपदी विराजमान होण्याची, ते मानाचे पद सांभाळण्याची राहुल गांधी यांची क्षमता आणि पात्रताही नाही. राहुल गांधींच्या एकूणच वागणुकीमुळे तसेच बोलण्यामुळे देशवासीयांचे निखळ मनोरंजन होते. सर्कसमध्ये जसा लोकांचे मनोरंजन करण्यासाठी विदूषक असतो तसेच संसदेत राहुल गांधी आहेत, असे म्हणायला हरकत नाही.

नीती आयोगाची वार्षिक बैठक शनिवार २७ जुलैला होत आहे. या बैठकीत देशाच्या विविध राज्यांतील विकासाच्या आराखड्यावर चर्चा केली जाते, पण यावेळच्या बैठकीवर काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी बहिष्कार घातला आहे. असे करून काँग्रेस आणि विरोधी शासित राज्यांचे मुख्यमंत्री आपल्या हाताने आपल्या पायावर दगड पाडून घेत आहेत. आपल्या राज्याच्या विकासावर चर्चा करण्याची तसेच त्यासाठी निधी मिळवण्याची सुवर्णसंधी ते गमावत आहेत. नीती आयोगाच्या बैठकीवर काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी बहिष्कार घातल्यामुळे नुकसान सरकारचे नाही तर संबंधित राज्याचेच होणार आहे. विरोधी पक्षांचे विशेषत: काँग्रेसचे नेते देशातील जनतेत धार्मिक आधारावर फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. देशाची एकता आणि अखंडता धोक्यात आणत आहे, असे म्हटले तर ते फारसे चूक ठरू नये. पश्चिम बंगाल आणि विरोधकांच्या अन्य राज्यांत जे प्रकार सुरू आहे, ते धक्कादायक आहेत. या राज्यात महिलांवर अत्याचार केले जात आहेत, गोरगरीब जनतेला त्यांच्या न्याय्य हक्कांपासून वंचित ठेवले जात आहे. मुळात राहुल गांधी यांच्याकडून संयमाच्या आणि जबाबदारीच्या वागणुकीची अपेक्षा करणेच चुकीचे आहे. आतापर्यंत देशाला विरोधी पक्षनेत्यांची एक उज्ज्वल परंपरा लाभली आहे. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, सुषमा स्वराज अशा विरोधी पक्षनेत्यांना सरकार वचकून असायचे. विरोधी पक्षनेता बोलण्यासाठी उभा झाला तर मंत्र्यांना घाम फुटायचा. पण राहुल गांधी सभागृहात बोलण्यासाठी उभे होताच सभागृहातील तणाव कमी होतो. आता आपले कसे मनोरंजन होणार म्हणून सदस्यांचे लक्ष लागते. आपली अशी प्रतिमा तयार व्हायला राहुल गांधी स्वत:च जबाबदार आहेत. पप्पूपणाच्या प्रतिमेतून ते अद्याप बाहेर आल्यासारखे दिसत नाही. उलट आपली पप्पूपणाची प्रतिमा अधिक बळकट करण्याचे त्यांचे उद्योग सुरू असतात. खरं म्हणजे काँग्रेस पक्षात अनेक चांगले नेते आहेत, ज्यांच्याजवळ वक्तृत्व आहे, संसदीय नियमांचा ज्यांचा अभ्यास आहे, पण वासरात लंगडी गाय शहाणी असलेल्या त्या नेत्यांना बाजूला सारत राहुल गांधींच्या गळ्यात ही जबाबदारी टाकण्यात आली. राहुल गांधींच्या स्वभावात गंभीरपणा नाही तर उथळपणा जास्त आहे. त्यामुळे ते आपल्याबरोबर आपल्या पक्षाचे तसेच विरोधी पक्षनेतेपदाचेही हसे करून घेतात. राहुल गांधी आपल्यासोबत आपल्या पक्षाला तसेच अन्य विरोधी पक्षांनाही फरफटत नेत असतात. पण या पक्षांचे तसेच त्यांच्या नेत्यांचे डोळे उघडत नाही. राहुल गांधींच्या अशा कृतीने काँग्रेस पक्षाचे नुकसान होते; यापेक्षा संसदीय लोकशाहीचे मोठे नुकसान होते, ही चिंतेची बाब आहे. दु:ख म्हातारी मेल्याचे नाही काळ सोकावतो, त्याचे आहे. ▮


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# सावधान! देशी टूलकिट सक्रिय...

अमेरिकेमध्ये निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर कमला हॅरिस यांनी केलेल्या एका भाषणाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. त्या व्हिडीओमध्ये हॅरिस संविधान वाचवण्याची हाक देत आहेत. सोशल मीडियावर यावरून 'मिम्स' फिरत होते की, अमेरिकेचं संविधान धोक्यात आहे. खरं तर हा विनोदाचा भाग नसून, ही काळजी करण्यासारखी गोष्ट आहे. जगभरातील डावी वाळवी एकत्र येऊन आपापले देश पोखरण्याचा प्रयत्न करत आहेत व एकमेकांना मदत करत आहेत. ते एकच प्रकारची भाषा बोलत आहेत. ग्रेटा थनबर्न आणि इतर मंडळींमुळे असे लक्षात आले की, पाश्चात्त्य देशातले लोकंही भारताची सत्ता उलथवून टाकण्यासाठी प्रयत्न करत आहेत. या टूलकिट प्रकरणामुळे भारतीयांना कळून चुकलं की 'ब्रेकिंग इंडिया फोर्स' हे मिथक नसून सत्य आहे.

या टूलकिटचा पॅटर्न आपण समजून घेतला पाहिजे. इतर वेळी ते थोडे फार सक्रिय असतात; त्यांची सत्ता नसते तेव्हा ते आंदोलन, दंगली घडवून आणतात. निवडणूक जवळ येते तेव्हा ते बिळातून बाहेर पडतात आणि संविधान वाचवण्याची हाक देतात. सरकारवर खोटे आरोप करत सुटतात. विशेष म्हणजे यांच्यापैकी कुणीही प्रत्यक्ष राजकारणात नसतं. आंदोलन करण्याचा यांचा पॅटर्न आहे. जनतेचा एखादा प्रश्न घेऊन हे लोक आंदोलन करतात. यांची सत्ता नसते तेव्हा ही आंदोलने दीर्घकाळ चालतात. या आंदोलनाच्या आडून ते मूळ आंदोलनाचा विषय नसलेल्या मुद्यावरून सरकारवर आणि एका विशिष्ट प्रमुख नेत्यावर टीका करतात. शेतकरी आंदोलन असेल तर सरकार अघोषित आणिबाणी लादत आहे, सरकार संविधान बदलणार आहे अशा प्रकारची टीका होते. आता शेतकऱ्यांच्या एका विशिष्ट मागणीचा आणि आणिबाणी लादण्याचा व संविधान बदलण्याचा काहीही संबंध नसतो. पण या गोष्टी ते मुद्दाम करतात. कारण लोकांमध्ये गोंधळ निर्माण करणं हा एकमेव हेतू असतो. आपण लोकांना काही चांगलं देऊ शकलो नाही किंवा त्यांना मार्गदर्शन करू शकलो नाही तर लोकांच्या मनात गोंधळ निर्माण करून त्यांना सरकारच्या विरोधात भडकवून निवडणुकीत फायदा उचलण्याचा हा प्रकार आहे.



या आंदोलनात एका प्रमुख नेत्याची प्रतिमा मलिन केली जाते. म्हणजे आंदोलन पर्यावरणासाठी असले किंवा आरक्षणासाठी असले, तरी एका प्रमुख नेत्याला टार्गेट केले जाते. तो बिचारा जातीने ब्राह्मण असेल, तर त्यांना सॉफ्ट टार्गेट मिळतं. त्या नेत्यावर गलिच्छ आरोप करून त्याची राजकीय कारकीर्द बरबाद करण्याची धमकीही दिली जाते. त्याच्यावर खोटे आरोप केले तर लोकांची विश्वासार्हता कमी होते. विशेष म्हणजे या आंदोलनाच्या, चळवळीच्या पॅटर्नमध्ये हे लोक संविधान वाचवण्याची भाषा करत असले, तरी अनेक हिंसक गोष्टींना हे उघडपणे पाठिंबा देतात. उदाहरण सीएए, एनआरसी विरुद्धच्या आंदोलनात झालेली तोडफोड, दंगली यांना सरळसरळ आणि उघड पाठिंबा देण्यात आला. इतकी वर्षे काश्मीरमध्ये दगडफेक व्हायची, तेव्हा या डाव्या लोकांनी जाहीर समर्थन केले होते.

हा टूलकिटचा पॅटर्न २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काही प्रमाणात यशस्वी झाला, असं म्हणावं लागेल. आता विधानसभेची निवडणूक जवळ येतेय आणि नवं टूलकिट मार्केटमध्ये आलेलं आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे श्याम मानव यांनी आता हे सरकार पाडायची जबाबदारी घेतली आहे का, असा प्रश्न आपल्या मनात निर्माण होतो. अचानक श्याम मानव यांनी फडणवीसांविरोधात विधान करायला सुरुवात केली आहे. ते म्हणाले, माजी गृहमंत्री अनिल देशमुखांवर इतका दबाव होता, कुटुंबाचा प्रश्न होता, त्यांच्या राजकीय भवितव्याचा प्रश्न होता. त्यांनी कुठल्याही प्रतिज्ञापत्रावर सही केली नाही. तरी त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. ते आत्महत्या करण्याच्या विचारात होते. आता अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे श्याम मानव आणि अनिल देशमुख प्रकरण यांचा काहीही संबंध नसताना ते बेछूट विधान करत सुटले आहेत. दुसरी गोष्ट अनिल देशमुखांवर गंभीर आरोपाखाली कारवाई झालेली आहे आणि हे प्रकरण आता न्यायप्रविष्ट आहे.

सोशल मीडियावर एक पत्रक फिरत होतं. २४ जुलै २०२४ रोजी नागपूरमध्ये सामाजिक संघटना मेळावा भरवण्यात आला होता. त्यात श्याम मानव यांची प्रमुख उपस्थिती असल्याचे नमूद केले होते. आता हा सामाजिक संघटन मेळावा कशासाठी भरवण्यात आला होता? मेळाव्याचा विषय होता, येत्या विधानसभा निवडणुकीत पुरोगामी सामाजिक चळवळींची भूमिका. म्हणजेच श्याम मानव अचानक राजकारणावर का बोलू लागले? हे यातून स्पष्ट होतं. आता महाराष्ट्र सरकारवर विशेषतः फडणवीसांवर बरेच आरोप होणार आहेत. फडणवीस भाजपा या हिंदुत्ववादी पक्षाचे नेते, त्यात ब्राह्मण त्यामुळे त्यांना टार्गेट करणे खूप सोपे आहे. भाजपाचा पराभव करण्यासाठी, त्यांच्या विधानसभेतील जागा कमी करण्यासाठी पुढील एक-दोन महिन्यात अनेक गोष्टी घडण्याची शक्यता आहे. प्रश्न असा आहे की, जरी सरकारला नॅरेटिव्ह आणि टूलकिटची समस्या कळली असली तरी त्यावर त्यांच्याकडे विशेष उपाययोजना नाही. राजकारणी नसलेले डावे लोक जेव्हा चळवळी उभ्या करतात तेव्हा त्यांच्या विचारांच्या राजकीय पक्षाचं त्यांना समर्थन असतं, अनेक प्रकारे आर्थिक पाठिंबा त्यांना मिळतो. म्हणूनच कामधंदे बाजूला ठेवून इतके मोठे आणि दीर्घकाळ आंदोलन करता येते. 'वसुधैव कुटुंबकम्' विचार पुढे घेऊन जाणारे अनेक विचारवंत या टूलकिट विरोधात आवाज उठवतात, लेख लिहितात, भाषणे देतात. पण जोपर्यंत हा पॅटर्न समजून त्यावर तशाच प्रकारच्या विशेष उपाययोजना केल्या जात नाहीत, तोपर्यंत या डाव्या विषाणूला पराभूत करता येणार नाही. कोरोनाचं संकट जेव्हा आलं, तेव्हा कोरोनावर विशेष लस काढावी लागली. विशिष्ट रोगावर विशिष्ट औषधोपचार केले जातात तरंच त्या रोगातून मुक्त होता येते. दुर्दैव असे की, डाव्या विषाणूवर अजून लस निघालेली नाही. ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# घुसखोरीच्या दानवाचे दमन व्हावे

लोकसभेच्या अधिवेशनात आमचे दहा टक्के आदिवासी गेले कुठे असा प्रश्न झारखंडच्या गोड्डा येथील खासदार निशिकांत दुबे यांनी उपस्थित केला. त्यांच्या या प्रश्नातून अनेक प्रश्न निर्माण झाले. त्या प्रश्नांमुळे विचारसरणी कुठलीही असली, तरी राष्ट्रभक्तीची ज्योत अंतर्मनात प्रज्वलित असणारा प्रत्येक नागरिक अस्वस्थ झाला असेल. लोकसंख्येचे झपाट्याने होणारे असंतुलन हा त्यांचा मुख्य मुद्दा होता. त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न त्यांच्या परिसराकरिता अत्यंत संवेदनशील किंवा विकोपाला गेलेले असले, तरी कमी-अधिक फरकाने देशाच्या सर्वच भागांत ही समस्या हळूहळू पाय पसरवत असल्याचे दिसून येते. याचे ताजे उदाहरण म्हणजे अकोला शहरात दोन अफगाणी नागरिकांनी बनविलेले भारतीय निवडणूक ओळखपत्र. अफगाणिस्तानातून दीर्घ मुदतीच्या व्हिसावर दोन जण अकोल्यात येतात, वास्तव्य करतात आणि भारतीय निवडणूक ओळखपत्र मिळवतात. येथे मात्र त्यांच्या मनातील 'पाप' उघड होते. अर्थात काही स्थानिकांचा त्यांच्या या पापात सहभाग असल्याशिवाय असे घडणे शक्य नाही. या देशद्रोही कृत्यात कुणा-कुणाचा सहभाग आहे? त्यांना प्रशासकीय मदत कुणी केली का? त्यांचा भारतीय निवडणूक ओळखपत्र मिळविण्याचा हेतू काय? देशविघातक कृत्यात त्यांचा सहभाग तर नाही ना, असे एक ना अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यातच जर नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी मतदान केले असेल तर ही अत्यंत गंभीर बाब म्हणावी लागेल.

महाराष्ट्रात केवळ अकोलाच नव्हे तर मुंबई, मुंबई उपनगर, पुणे आदी भागांतूनही बांगलादेशी घुसखोरांनी बनावट कागदपत्रांद्वारे आधारकार्ड व तत्सम ओळखपत्र तयार केल्याची प्रकरणे सातत्याने उघडकीस येत आहेत. ही चिंताजनक बाब असतानाच या चिंतेत भर घालणारे एक प्रकरण सातारा जिल्ह्यातून समोर आले. सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात शिरसगाव (वडगाव) येथे बांगलादेशी महिला आढळून आली. तिने बनावट जन्म दाखला तयार करून आधार कार्ड बनविले. तिच्या विरोधात पोलिसांनी कारवाई केली. पण ज्यावेळी चौकशी झाली त्यावेळी केवळ आधारकार्डच नव्हे तर पॅनकार्ड आणि एचडीएफसी बँकेचे खाते या घुसखोर महिलेने तयार केले होते. महाराष्ट्रात बांगलादेश, म्यानमार आदी देशांतून घुसखोरी करण्याची संख्या मोठी आहे. त्यातील काहींना अटकही होते. पण अटक झालेल्यांची संख्या केवळ हिमनगाचे टोक असल्याचे या समस्येच्या अभ्यासकांचे मत आहे. मुंबईत चार बांगलादेशींना मे महिन्यात अटक करण्यात आली त्यावेळी त्यांनी भारतीय पारपत्र मिळविल्याचे उघड झाले. केवळ एवढेच नव्हे तर त्यातील एक जण पारपत्राच्या आधारे विदेशात नोकरीला गेला होता. हे उदाहरण अभ्यासकांच्या मतांना पुष्टी देणारे आहे.

निवडणूक मतदारयादी अद्ययावत करीत असताना दर पाच वर्षांनंतर मतदार संख्येत १५ ते १७ टक्के वाढ होत असते. पण झारखंड राज्यातील मधुपूर विधानसभा क्षेत्रातील २६७ बुथवर १२३ टक्के वाढ झाल्याची धक्कादायक माहिती लोकसभेत भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी दिली. ही वाढ नैसर्गिक निश्चितच नाही. या ठिकाणी बांगलादेशी घुसखोरीचे प्रमाण किती भयंकर आहे, हेच अधोरेखित करणारी ही संख्या. स्वाभाविकच केवळ मतदार संख्येतील ही वाढ इतकीच याची व्याप्ती नसून त्याचे सामाजिक परिणाम तेथे जाणवत आहेत. त्यातूनच ३६ टक्के असणारी आदिवासी संख्या आता २६ टक्क्यांवर आली आहे. या प्रकाराने उद्विग्न होऊनच दुबे यांनी लोकसभेत प्रश्न उपस्थित केले आहेत. दुर्दैवाने तेथील मुख्यमंत्र्यांनी मात्र हा भाजपाच्या आवडीचा विषय आहे, असे म्हणून ज्या तुष्टीकरणामुळे त्यांच्या पक्षाच्या ज्येष्ठांनी देशात अनेक समस्या यापूर्वीच निर्माण करून ठेवल्या त्याच तुष्टीकरणाची 'री' ओढली. देशात पाच कोटी बांगलादेशी घुसखोर असल्याचे बोलले जाते. या घुसखोरांकडे भारतीय मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, पॅनकार्ड, रेशनकार्ड एवढेच नव्हे तर पासपोर्टसुद्धा उपलब्ध आहे. ज्या कागदपत्रांसाठी भारतीय माणसाला महिनोंमहिने शासकीय कार्यालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात, ती कागदपत्रे या घुसखोरांना सहज उपलब्ध होतात कशी हा खरा प्रश्न आहे. एकीकडे देशाला 'परम् वैभव' मिळावे म्हणून काम करणारी राष्ट्रभक्त शक्ती, तर दुसरीकडे २०४७ पर्यंत भारताला 'गजवा-ए-हिंद' अर्थात इस्लामी राष्ट्र करण्यासाठी वाट्टेल ते करणारे या दोघांमधील हा संघर्ष आहे. यात राष्ट्रभक्तांची सरशी व्हावी, घुसखोरीच्या दानवाचे दमन व्हावे म्हणून प्रत्येक नागरिकाला सजग, सतर्क राहावे लागेल. ▮

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# अज्ञानाचा अभिमान बाळगणारे नेते!

खुर्ची टिकाओ अर्थसंकल्प, स्वातंत्र्यपूर्व काळात ईस्ट इंडिया कंपनीस खंडणी देऊन, आपले व्यापार उद्योग चालविले तसेच खंडण्या देऊन दिल्लीतील डळमळीत खुर्च्या वाचविल्या जात आहे. हम दो हमारे दो अर्थसंकल्प, महाराष्ट्राशी बेईमानी, महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली, महाराष्ट्राला काय मिळाले? महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना काय मिळाले? असे एक नव्हे अनेक प्रश्न केंद्राच्या अर्थसंकल्पावर, तब्बल चार वेळा राज्यसभेचे खासदार असलेल्या, २० वर्षे देशाच्या वरिष्ठ सभागृहाचा अनुभव असलेल्या, संजय राऊत यांनी उपस्थित केले आहेत. बरं, 'बडे मियां तो बडे मियां छोटे मियां सुभान अल्लाह!' छोटे मियांने एक ट्विट करून अर्थसंकल्पात महाराष्ट्राचा उल्लेख तरी केला काय, असा प्रश्न विचारून टाकला. आता अज्ञानाचा अभिमान बाळगणारे जर यांचे नेते असतील तर अशा नेत्यांचे शिपाई कसे असेल हे शिपायांनी यावेळी अर्थसंकल्पावर प्रश्न उपस्थित करून शिक्कामोर्तब केले आहे. यांच्या नेतृत्वाने तर पहिलेच आपल्याला अर्थसंकल्पातलं काहीही एक कळत नसल्याचं सांगून 'गिव्ह अप' केलं आहे. तर, तब्बल २० वर्षे सभागृहात राहून आपल्याला काही समजत नसल्याचं शिपायाने यावेळी सिद्ध केलंय्.

मुळात विरोधी पक्षातील नेत्यांना आता रडगाण्याची सवयच जडली आहे. यांचा विकासाशी, बांधिलकीशी, वचनपूर्ततेशी काही संबंध नसल्याने यांना केवळ खंडणीची भाषाच कळते. यामुळे यांचे सरकार होते तेव्हा यांचा गृहमंत्री १०० कोटींची खंडणी गोळा करण्याच्या आरोपात अडकला. यांचा माजी प्रवक्ता तुरुंगात आहे तर मराठी माणसांच्या घरांच्या प्रकल्पात खंडणी, पीएमसी बँक घोटाळ्यात खंडणी घेणारा राऊत जामिनावर बाहेर आहे. अशांना खंडणी नाही तर दुसरं काय दिसणार? 'आपलं कुटुंब आपली जबाबदारी'वाल्यांना 'हम दो हमारे दोच' दिसणार ना. स्वतःचा मालक काँग्रेस-राष्ट्रवादीच्या कुबड्यांवर मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसला होता. त्या तीन वर्षांच्या काळात 'डळमळीत खुर्ची बचाव योजना' कशी राबविली, हे अवघ्या महाराष्ट्राने बघितले आहे. या योजनेचा यांना दांडगा अनुभव असल्याने कदाचित तेच उदाहरण देत असावेत. रालोआचं पूर्ण बहुमताचं सरकार सत्तेत आलं. २४० जागा एकट्या भाजपाच्या आल्या आणि ९ जण घेऊन हे बेणं बहुमत काढून घेतल्याची टिमकी वाजवत आहे. बुद्धीची कीव यावी त्याही पलीकडे राऊतांच्या बुद्धीला जंग चढलाय्, असेच म्हणावे लागेल.



महाराष्ट्राला काय मिळाले? संसदेच्या आवारात घोषणाबाजी करून 'फेक नॅरेटिव्ह' पसरविण्याचा प्रयत्न केला. विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून रोज असाच प्रयत्न चालविला जात आहे. मात्र, या अर्थसंकल्पात विदर्भ-मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पाला ६०० कोटी, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते सुधार योजनेला ४०० कोटी, सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक कॉरिडॉरसाठी ४६६ कोटी, पर्यावरणपूरक शाश्वत कृषी प्रकल्पासाठी ५९८ कोटी, महाराष्ट्र कृषी आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्पासाठी १५० कोटी, एमयूटीपीकरिता ३ : ९०८ कोटी, मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी १०८७ कोटी, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरकरिता ४९९ कोटी, एमएमआर ग्रीन अर्बन मोबिलिटीसाठी १५० कोटी, नागपूर मेट्रोसाठी ६८३ कोटी, नाग नदी पुनरुज्जीवनासाठी ५०० कोटी, पुणे मेट्रोकरिता ८१४ कोटी, मुळा-मुठा नदी संवर्धनाकरिता ६९० कोटी रुपये मिळणार आहेत. याशिवाय रेल्वे विभागांतर्गत १५ हजार ९४० कोटी रुपयांची तरतूद महाराष्ट्रासाठी करण्यात आली आहे.

प्रत्यक्षात पूर्वोदय योजना झारखंड, पश्चिम बंगालमध्ये राबविल्या जाणार आहे. अमृतसर-कोलकता कॉरिडॉर अर्थात पंजाब आणि पश्चिम बंगाल राज्यातील विकासाचा मार्गच म्हणावा लागेल. औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी विशाखापटणम्-चेन्नई इंडस्ट्रियल कॉरिडॉर, हैदराबाद-बंगळुरू कॉरिडॉर, अर्थात पहिला तामिळनाडू आणि दुसरा कर्नाटक राज्यात विकासाचा मार्ग पोहोचेल, व्यापार वाढविण्यासाठी दळणवळणाची व्यवस्था होईल, याचा त्या राज्यांना फायदा मिळेल. सिंचन आणि पूर निर्मूलनासाठी बिहारला निधी दिल्याची आवई उठविणाऱ्या विरोधकांच्या प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेसशासित हिमाचल प्रदेशलादेखील निधी देण्यात आला आहे. कर्नाटक, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश ही राज्ये भाजपाची किंवा भाजपाच्या मित्रपक्षांची सत्ता असलेली नाहीत. या व्यतिरिक्त देशातील पायाभूत सुविधांसाठी ११ लाख ११ हजार १११ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, देशात चौफेर निधी खर्च केला जाणार आहे. तर, अन्य जशा सौर ऊर्जा, प्रधानमंत्री आवास योजना, कृषी संसाधनं, ईपीएफओचा लाभ, सामान्य जनतेला कर सवलतीतून सुमारे १७ हजार ५०० रुपयांचा दिलासा, रोजगार, इंटर्नशिपसारखे लाभ तर देशातील प्रत्येकाला मिळणार आहे. येत्या दोन वर्षांत देशभरातील एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यानंतर प्रमाणपत्र आणि ब्रॅण्डिंग व्यवस्था दिली जाणार आहे. त्यासाठी सहाय्य दिले जाणार आहे. हे देशातील प्रत्येक राज्यातील शेतकऱ्यांना मिळणार आहे. यावर्षी कृषी आणि संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याचा लाभ भाजपाशासित राज्यांतील व्यक्तींना मिळेल आणि विरोधी पक्षशासित राज्यांतील व्यक्तींना मिळणार नाही, अशातला भाग नाही. यावेळी सादर झालेल्या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवा, गरीब या चारही घटकांसाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रालासुद्धा सिंचन, रस्ते, मेट्रोसह विविध प्रकल्पांना मोठा निधी मिळाला आहे. युवकांवर भर देणारा आणि उद्याच्या भारतावर मोठी गुंतवणूक करणारा हा अर्थसंकल्प आहे. सर्वसमावेशक विकासाचा अंतर्भाव असणाऱ्या या अर्थसंकल्पात कुणावरही अन्याय झालेला नसताना, विरोधकांचा कशासाठी हा कांगावा चालला आहे? हे कळण्यापलीकडे आहे. एक तर शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही म्हणून शेतकऱ्यांनी मतं दिली नाही, मोदी नको, भाजपा नको म्हणून मतं दिली नाही, मराठ्यांनी विरोध म्हणून मतं दिली नाही, आरक्षण घालवते म्हणून मतं दिली नाही, हे सरकारच नको म्हणून मतं दिली नाही, अल्पसंख्यकांवर अन्याय होतो म्हणून मतं दिली नाही, खटाखट खटाखट पैसे मिळेल म्हणून मतं दिली नाही आणि आता जे नकोसे झाले होते, त्यांना आपलेसे करणाऱ्यांनी पुन्हा पदावर बसविले असेल तर, जोरकस समर्थन करणाऱ्यांना झुकतं माप देणे हा मानवी स्वभाव आहे. तसे झाले असेल तर नकोशा झालेल्या आणि प्रखर विरोध असलेल्या व्यक्तीकडून अपेक्षा का म्हणून करावी? यांचं सरकार आलं की, ज्यांच्यावर अन्याय झालाय् त्यांची खटाखट खटाखट नुकसान भरपाई करून घ्यावी. ▮

९२७०३३३८८६

## राजकारणात महिलांचे स्थान

लोकसभेच्या पहिल्या निवडणुकीपासून महिलांना मतांचा अधिकार प्राप्त झाला असला, तरी लोकसभा आणि विधानसभेच्या सभागृहांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व मात्र आजवरही फारसे समाधानकारक राहिलेले नाही. राजकारणामध्ये सुरुवातीपासूनच पुरुषांना जास्त महत्त्व दिले आहे. राजकारणामध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांची संख्या कमी दिसून येते. अनेक ठिकाणी महिला राजकारणात दिसून येतात. परंतु त्यांचे निर्णय ते स्वतः घेत नाहीत. त्यांच्या मागे त्यांचे निर्णय घेणारे नवरा, भाऊ, किंवा वडील हे प्रतिनिधित्व करताना दिसतात. ग्रामीण भागामध्ये अनेक ठिकाणी असेच सुरू आहे. महिलांना फक्त नावापुरते उमेदवार म्हणून उभे करतात; निर्णय मात्र पुरुषच घेतात. भारतातील पहिली निवडणूक १९५२ साली पार पडली. तेव्हापासून महिलांना मतांचा अधिकार प्राप्त झाला. परंतु प्रतिनिधित्व मात्र आजवरही कमीच राहिले आहे. महिलांना प्रतिनिधित्व मिळून देण्यासाठी दोन पद्धती वापरल्या जातात; एक म्हणजे इच्छुक किंवा कायदेशीर अनिवार्य असणे आणि दुसरं म्हणजे संसदेमध्ये महिलांसाठी राखीव जागांची तरतूद असते. या दोन्ही प्रकारे महिलांना प्रतिनिधित्व प्राप्त होते. सत्ताधारी भारतीय जनता पक्ष, विरुद्ध पक्ष आणि असलेल्या काँग्रेस पक्षाकडे प्रत्येकी १३ टक्के महिला खासदार आहेत. महिलांना राखीव जागा दिल्या तरीही देशांच्या संसदेमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व वाढल्याची शाश्वती देता येत नाही. अजूनही पुरुषांच्या तुलनेत संसदेत महिलांची संख्या ही कमीच आहे. त्यामुळे विविध राज्यांच्या विधानसभामध्ये महिलांच्या प्रतिनिधित्वाची आकडेवारी फारच चिंताजनक दिसून येते.

**उज्ज्वला रौंधळ**/अंधेरी, मुंबई

●● ●●

## बांगलादेशात आंदोलनाचे वादळ!

बांगलादेशात विद्यार्थी आणि सरकार यांच्यामधील वाद चिघळल्याचे पाहायला मिळाले. बांगलादेशामध्ये १९७१ साली स्वातंत्र्ययुद्धात लढणाऱ्या आणि मरण पावलेल्या सैनिकांच्या मुलांना नोकऱ्यांमधील एकूण ५६ पैकी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्याविरोधात विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी गेले अनेक दिवस निषेध मोर्चे काढले. या आंदोलनाला एकप्रकारे हिंसाचाराचे स्वरूप आले. यामध्ये झालेल्या मृतांची संख्या ही शंभरी पार झाली असून, हजारो लोक जखमी झाले आहेत. जवळपास आज १८ कोटी लोकसंख्येच्या बांगलादेशात १.२५ कोटी बेरोजगार तरुण आहेत. त्यामुळे रोजगार न मिळालेले हे तरुण अखेर रस्त्यावर उतरले. 'सैनिकांच्या मुलांना सरकारी नोकरीत आरक्षण नको. त्यांना गुणवत्तेच्या आधारेच नोकरी द्या' अशी तरुणांची सरकारला मागणी होती. निवडणुकीच्या विजयानंतर शेख हसीना यांनी या मागण्यांचा पूर्ण विरोध केला. यालाही कुठेतरी राजकारणाची जोड ही नक्कीच होती. अशा आरक्षणामुळे श्रीमंत हा अधिक श्रीमंत होतो आणि गरीब हा गरीब राहतो. या आंदोलनाचा परिणाम म्हणजे रविवारी सर्वोच्च न्यायालयाने ही टक्केवारी ५६ वरून ७ टक्क्यांवर आणली. त्यापैकी ५ टक्के आरक्षण हे स्वातंत्र्य लढ्यातील सैनिकांच्या मुलांसाठी राखीव ठेवण्यात आले. त्यामुळे कुठेतरी हा तरुणांच्या आंदोलनाचा विजय मानला जातो. या विजयासाठी अनेकांनी आपले जीव गमावले ही गोष्ट सुद्धा तितकीच खरी आहे.

**अपेक्षा पाटणकर**/ठाणे

## वाचक पत्रे

●● ●●

## निर्व्यसनी आयुष्य खरी संपत्ती!

आज समाजात युवा पिढीला विविध प्रकारचे व्यसन जडत आहेत. या विविध प्रकारच्या व्यसनांनी ग्रस्त हे युवक अत्यंत दुर्बल, निरुत्साही व कर्तृत्वशून्य बनत चालले आहेत. आजचे हे युवक आपली जीवनयात्रा ऐन उमेदीच्या काळात संपवत आहे, ही देशाच्या दृष्टीने अत्यंत दुर्दैवी बाब आहे, या देशाची मोठी हानी आहे. ज्या देशाचे युवक उच्चविद्याविभूषित, कार्यकुशल व कर्तृत्वसंपन्न असतात, त्या देशाचे भवितव्य अति उज्ज्वल व उन्नतशील असते. कृतिशील युवक, हेच उन्नतशील देशाचे खरे आधारस्तंभ असतात. त्यांच्या ज्ञान, कौशल्य व कर्तृत्वाने देशाच्या प्रगती व उन्नतीला गती येते हे त्रिकालाबाधित सत्य असतना या युवकांनी विविध व्यसनांच्या आहारी जाऊन आपली जीवनयात्रा संपविणे योग्य नाही.

तरुणांनी हताश, निराश व निरुत्साही न होता, मिळेल त्या कामांना प्राधान्य देऊन आपले कर्तृत्व सिद्ध करावे. केवळ सरकारी नोकरी मिळणे किंवा नामांकित कंपनी, बँक यामध्ये अधिकारी बनणे येथपर्यंत मर्यादित आपले ध्येय असू नये, हे स्वप्न अत्यंत उज्ज्वलतेकडे नेणारे आहे. पण यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे, जिद्द, चिकाटी व आत्मविश्वास बाळगणे, प्रबळ इच्छाशक्ती मनी असणे व ध्येय गाठण्यासाठी सकारात्मक मार्गक्रमण हे बाजूला ठेवून व्यसनांच्या आहारी जाऊन नाउमेद होणे योग्य नाही. एकदमच यश मिळेल असे नाही त्यासाठी थोडा अवधीही हवा असतो. मात्र पहिल्या प्रयत्नात अपयश आले, म्हणजे निराश होऊन व्यसनांच्या आहारी न जाता पुन्हा सकारात्मक प्रयत्न करणे, असे ध्येय प्रत्येकाचे असावे. निर्व्यसनी आयुष्य जगणे हीच खरी आजची संपत्ती होय. युवक व सर्वांनीच निर्व्यसनी आयुष्य जगून या अनमोल जीवनाचा मनसोक्त आनंद सकारात्मकतेने घ्यावा असे वाटते. ▮

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतकऱ्यांना पिक कर्जासाठी वेठीस धरणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

पिक कर्ज वाटपात राष्ट्रीयकृत बँकांकडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक पिळवणुक केली जात आहे. पिक कर्जासाठी विमा पॉलिसी अनिवार्य करून बँकेचे अधिकारी पिक कर्जातही पैसे कमविण्याचा नवा उद्योग करत आहेत. पिक कर्जासाठी बँकेच्या प्रत्येक शाखेला दिलेले टार्गेट पूर्ण होत नाही, त्यामुळे पिक कर्ज वाटपात अक्षम्य टाळाटाळ करून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणुक करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी याप्रकरणी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेची



उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

खरीप हंगामाच्या सुरुवातीला चांगले पर्जन्यमान झाल्यामुळे शेतकऱ्यांनी बी-बियाणे आणि खतांवर मोठा खर्च केला आहे. अनेक शेतकऱ्यांनी यासाठी विविध बँकांकडे पिक कर्जाची मागणी केली आहे. शासनाने सिबील स्कोअर न पाहता पिक कर्ज द्यावे, पिक कर्ज देण्यासाठी शेतकऱ्यांची अडवणुक करू नये असे आदेश दिलेले असतानाही स्टेट बँक ऑफ इंडियाच्या उमापूर शाखेचे व्यवस्थापक भुपेंद्र लारोकर व फिल्ड ऑफिसर लोकेश उईके यांनी तेथील शेकडो शेतकऱ्यांच्या बँक खात्यांना विमा पॉलिसी घेतल्याशिवाय कर्ज रक्कम उचलता येवू नये म्हणून 'होल्ड' लावले होते. या बाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी या बाबत त्यांना जाब विचारल्यानंतर त्यांनी तात्काळ 'होल्ड' उठविले.

# धीम्या गतीने रस्त्याचे काम ; प्रवाशांचे बेहाल

## रस्त्याचे काम तात्काळ करण्याची राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)पक्षाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२७ जुलै**

केज ते कानडीमाळी रस्त्याचे काम सुरु असून हे काम अत्यंत धीम्या गतीने व निकृष्ठ दर्जाचे होत असल्याने लोकांना रहदारी साठी नाहक त्रास होत आहे.त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की,केज ते कानडीमाळी रस्त्याच्या कामासाठी रस्ता खोदल्यामुळे नालीतील पाण्यामुळे व पावसामुळे रस्त्यावर पूर्णपणे चिखल झाल्याने रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे.लहान वाहनधारक घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे.तसेच ये जा करणाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.त्यामुळे या रस्त्याची एक बाजू प्रवासासाठी खुली करावी अन्यथा खा.बजरंग बाप्पा सोनवणे व मा. आ. पृथ्वीराज साठे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाव्दारे दिला आहे.निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार युवक तालुकाध्यक्ष कैलास चाळक,शहराध्यक्ष इमाद फरोकी, विष्णू पाटील,दीपक राऊत,ऋषीकेश जाधव,मेटे सुरेश, यश काळे,मोहम्मद हरणमारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात मिल रोलर पूजन कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ जुलै**

येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात गळीत हंगाम २०२४-२५ करीना मिल रोलरचे पूजन कारखान्याचे मा. चेअरमन साहेब श्री. विरेंद्रभैय्या सोळंके यांचे हस्ते काल दि २५ जुलै २०२४ रोजी दुपारी १.०० वाजता विधिवत पूजनाने संपन्न झाले. गळीत हंगाम २०२४-२५ सुरु करणेच्या दृष्टीकोणातुन कारखाना, आसवणी प्रकल्प व को.जन प्रकल्पाकडील ओव्हरऑयलींगची कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचबरोबर ऊस तोडणी वहातुकीचे कराराचे कामही अंतीम टप्यात आहे. कारखान्याचे संस्थापक स्व. सुंदररावजी सोळंके साहेब यांच्या कृपाशिर्वादाने तसेच कारखान्याचे मार्गदर्शक माआ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब, उपाध्यक्ष साखर संघ, मा.श्री. धेर्यशीलकाका सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री. जयसिंगभैय्या सोळंके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कारखाना प्रगतीपथावर आहे. आगामी गळीत हंगामासाठी संचालक मंडळाने ६.५० लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्घिष्ठ ठेवलेले असुन त्यासाठी कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, विगर सभासद ऊस उत्पादक शेतक-यांनी आपला ऊस कारखान्यास गळीतास देवुन सहकार्य करणेचे आवाहन कारखान्याचे चेअरमन श्री. विरेंद्रभैय्या सोळंके यांनी केले. या कार्यक्रमास कारखान्याचे संचालक मंडळासह कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री.आर.सी. बडगुजर, श्री.डी.एम.वरे जनरल मॅनेजर, श्री.एस.के.तौर वर्क्स मॅनेजर यांच्यासह सर्व खातेप्रमुख उपखातेप्रमुख, कर्मचारी व कामगार उपस्थीत होते.

# आष्टी मतदारसंघात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा

## खा.बजरंग सोनवणे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

आष्टी/पाटोदा तालुक्यासह जिल्हाभरात अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. मदती संदर्भात गुरूवारी जिल्हाधिका-यांना पत्र देण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे, मागील २ ते ३ दिवसांपासून आष्टी, पाटोदा तालुक्यासह जिल्हाभरात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील कांदा, उडीद,सोयाबीन, पिकांबरोबर इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. झालेल्या पिकांचे नुकसानीचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळून देण्याकरिता सुयोग्य ती कार्यवाही करावी. जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी घरांची पडझड झालेली असेल, शेती खरडून गेलेली असेल अशा ठिकाणी आपल्या तलाठ्यांनी स्वत: भेटी देवून स्थळ पंचनामे करून सामान्य नागरिकांना वेळेत मदत मिळवून देण्यासाठी काम करावे, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले असून त्यांच्या नुकसानीचे पंचनामे वेळेत करणे आवश्यक आहे. शासन स्तरावर मदत करण्यासाठी पंचनामे आवश्यक असतात. यामुळे तातडीने पंचनामे करून अहवाल तयार करावा, असेही पत्रात म्हटले आहे. खा.बजरंग सोनवणे हे सद्या दिल्ली येथे अधिवेशनात आहेत. तरीही त्यांचे जिल्ह्याकडे लक्ष लागलेले असून शेतकऱ्यांच्या मदतीसंदर्भात त्यांनी पत्रव्यवहार केला आहे.

# गेवराईतील उघड्यावरील मांस विक्री थांबवा-मागणी



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२७ जुलै**

गेवराई येथील विविध रोडवरील अतिक्रमित व उघड्या जागेवरील पशूंची कत्तल व उघड्यावरील मांस विक्री बंद करणे बाबत व्यापारी, उद्योजक व विविध संघटनांनी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक विक्रम मांडुरके आणि नायब तहसीलदार गेवराई यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे . याबाबतचे सविस्तर माहिती अशी की, गेवराईतील बीड रोडवरील झमझम पेट्रोल पंपापासून ते रुद्रेश्वर मंदिर चौक, जातेगाव फाटा, मोंढा नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कोर्टासमोर, जमादारनी पुलाजवळ, पांढरवाडी फाटा आदी ठिकाणी सर्रास उघड्यावर पशूंची कत्तल करून ते कत्तल केलेल्या पशुंना उघड्यावर लटकवून उघड्यावर मांस विक्री चालू आहे . सदर उघड्यावर कत्तल व मांस विक्री केल्यावर उरलेले मासाचे तुकडे व रक्त तिथेच रस्त्यावर पडल्याने

मोकाट कुत्र्यांचा संचार मोठ्या प्रमाणावर वाढलेला आहे .सदर रोड वरून पायी किंवा दुचाकीवरून जाताना सदर मोकाट कुत्रे मागे लागून अपघात होतात . सदर रस्त्यावरून हिंदू समाजाच्या दिंड्या, पालख्या, हिंदू व जैन समाजाचे साधुसंत मुनी, नागरिक मंदिरात जा ये करतात . लहान मुले शाळेत जात असताना या उघड्यावरील पशुंच्या कत्तलीचा त्यांच्या बालमनावर हिंसक विपरित परिणाम होत आहे . यापूर्वी प्रशासनाला अनेकदा निवेदने दिलेली आहेत . परंतु यावर कार्यवाही झालेली नाही . बरेच मटन शॉप हे अतिक्रमण जागेवर व उघड्यावरील कत्तलखाने आहेत . उघड्यावरील मांस विक्री ताबडतोब बंद करण्याच्या सूचना संबंध अधिकारी यांना देण्यात याव्यात तसेच गेवराईतील सर्व मटण विक्रेत्या व्यापाऱ्यांसाठी कत्तल खाण्यासाठी मटन मार्केटसाठी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी विनंती निवेदनात करण्यात आलेली आहे . या निवेदनाचा उद्देश कोणत्याही समाजाला टार्गेट करणे अथवा त्रास देणे हा नसून सुंदर व रोगराईमुक्त प्रसन्न व सुंदर व सुरक्षित शहर करावे हीच सर्वांची इच्छा आहे. सर्वांनी आपसात सदभावनेने राहावे .आपल्यामुळे इतरांना त्रास होऊ नये ही या निवेदना मागची भावना आहे . या निवेदनावर गेवराई शहर व्यापारी संघटना, हिंदू जनजागृती समिती, बजरंग दल, सकल जैन समाज, सकल माहेश्वरी व राजस्थानी समाज , व्यापारी व उद्योजक महासंघ छावा संघटना आदींच्या वतीने हे निवेदन प्रशासनाला देण्यात आले आहे . यावर त्वरित कार्यवाही करावी अन्यथा आंदोलनासारखे हत्यार उपसावे लागेल ,असा इशारा ही निवेदनात देण्यात आला आहे.

# श्रीसंत गजानन महाराजांच्या पालखीचे आज बीड शहरात आगमन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

श्रीक्षेत्र शेगाव निवासी श्रीसंत गजानन महाराजांची पालखी पंढरपुरच्या आषाढीवारी सोहळा भक्तीभावाने साजरा करुन शेगावकडे मार्गक्रमण करीत आज रविवार दि.२८ रोजी सकाळी ठिक ८.०० बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे आगमन होत आहे.



बीड शहरात पालखीचे आगमन झाल्यानंतर पालखी शहरातील राजुरी वेस, कारंजा रोड, बलभीम चौक, धोडीपुरा, माळीवेस, सुभाष रोड, नवा पुल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा मार्गे, बालाजी मंदिर मोढा रोड, विठ्ठल मंदिर चौक, शुक्रवार पेठ ,काळा हनुमान ठाणा, शनिवार पेठ, रविवार पेठ, खडकपुरामार्गे श्रीक्षेत्र कंकालेश्वर मंदिर येथे मुक्कामी थांबणार असून पालखीचा मुक्काम असताना श्रींचे पुजन, भजन, हरी किर्तन आदींसह विविध धार्मिकविधी संपन्न होत असून बीड शहरातील महिला, पुरुष भावीकभक्तांनी श्रींच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्ती आनंदाचा लाभ घ्यावा असे आवाहन दिंडी व्यवस्थापक गजानन महाराज संस्थान शेगाव, विठ्ठल मंदिर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प..श्री.एकनाथ महाराज पुजारी, मंदिरचे पुजारी संजय गुरव यांनी आवाहन केले आहे.

# अखेर रोहन गलांडे पाटील यांच्या उपोषनाला आले यश

## पत्रकार, सरपंच,माजी आमदार, प्रशासनाने सोडले उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२७ जुलै**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला काम सुरू करण्यासाठीची तीर्थक्षेत्राचे काम प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषणाला बसले होते तरी उपोषणाच्या तीसऱ्या दीवशी सार्वजनिक बांधकाम केज यांनी प्रत्यक्षात कामाला सुरुवात केली व मागण्या तीर्थक्षेत्राचे काम सुरू केल्यानंतर पुर्ण करण्यासाठी पाच मागणी मान्य,काम सुरू केल्यानंतर बंद करण्यात येणार नाही मागणी मान्य,तीर्थक्षेत्रांच्या कामासाठी लागणारी पुर्ण सामग्री कार्यक्षेत्रात उपलब्ध कधी तर उपलब्ध केली आहे मागणी मान्य ,तीर्थक्षेत्र तात्काळ कामाला स्वता गुत्तेदार , बांधकाम विभागाचे अधिकारी, गावकरी यांच्या हस्ते नारळ फोडुन करण्यात यावे




मागणी मान्य.काम बंद केले तर याला जबाबदार कार्यकारी अभियंता युवराज मळीकर आहे

वरील प्रमाणे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व मागण्या मान्य करुन व इतर मागण्या व मागिल उपोषणातील मागण्या मान्य करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे व रोहन गलांडे पाटील यांनी उपोषणाला काम पुर्ण होईपर्यंत स्थगिती दिली यावेळी उपस्थित माजी आमदार पृथ्वीराज साठे, जेष्ठ नेते सुरेश तात्या पाटील, माजी सरपंच सुनील बापु देशमुख, मंडळ अधिकारी मस्के साहेब,तलाठी क्षीरसागर साहेब,जेष्ठ पत्रकार रामदासजी तपसे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, युवराज मगर सर, शिवाजी आबा गायकवाड,जेष्ठ शिवसैनिक लक्षीमन तात्या गलांडे, दत्ता पाटील गलांडे,अभियंता अतुल मुंडे, गुत्तेदार चंदनशिव, अशोकराव देशमुख, मुन्ना नखाते, भैरवनाथ हुंबे, जालिंदर हुंबे, बाळासाहेब घोडके व जेष्ठ , समाजसेवक व गावकऱ्यांच्या मदतीने अखेर रोहन गलांडे पाटील यांनी अमरण उपोषणाला काल स्थगिती दिली यावेळी बोलताना रोहन गलांडे यांनी म्हटले तीर्थक्षेत्र विकास कामाचे यश माझे नसुन लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकार, संपादक, उपसंपादक , न्यूज, पोर्टल व सर्व सहकाऱ्यांचे आहे असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे.

# स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई शैक्षणिवर्ष२०२४-२०२५ वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रि शताब्दी जयंती वर्ष साजरे करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. दिनांक २७ जूलै २०२४ रोजी स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रि शताब्दी जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदिप जोशी सर अध्यक्ष म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते. प्रमुख वक्ते म्हणून म्हणून स्वा.सावरकर महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री.शशिकांत पसारकर सर व विभाग प्रमुख श्री . सचिन सानप सर यांची उपस्थिती व्यासपीठावर उपस्थिती होती.



प्रा. श्री.शशिकांत पसारकर सरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची शैक्षणिक कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करुन देण्यात आली.त्यामध्ये त्यांनी त्यांचा इतिहास, बालपण, एकाग्रता, महादेवाचे भक्त, प्रामाणिक गुण, प्रशासन कशाप्रकारे चालवायचे, लढाई कशाप्रकारे लढवायच्या अशा विविध मुद्द्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री . प्रदीप जोशी सरांनी अध्यक्ष समारोपात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशतब्दी जयंती निमित्त त्यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली.तसेच दिनांक २२जूलै २०२४ ते दिनांक २८जूलै २०२४ या शिक्षण सप्ताह अंतर्गत सहाव्या दिवशी इको क्लब थीम अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड लावावे असे सांगण्यात आले.महाराष्ट्र शासनाचा आनंददायी शनिवार अभ्यासक्रम अंतर्गत शाळेतील शिक्षिका श्री. पल्लवी खंबायते व श्रीमती.सारिका सुर्यवंशी यांच्या प्रयत्नाने इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी मला बाजाराला जायचं न्हाय ही नाटिका सादर केली. तसेच इयत्ता सातवी मधील विद्यार्थ्यांनी एक देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. अशाप्रकारे शाळेत सर्व शिक्षकांच्या सहकार्याने कार्यक्रम संपन्न झाला.

# लोककलावंतांचा छ. संभाजीनगरमध्ये राज्यव्यापी मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ जुलै**

लोककला समाजाचे सांस्कृतिक जीवन प्रतिबिंबित करतात. महाराष्ट्राला लोककलेचा फार मोठा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. तिचे अस्तित्व आणि संवर्धन करण्यासाठी भाजपा महायुतीचे राज्य सरकार कटीबद्ध आहे. मानधनात दुप्पट वाढ करून, संस्कृतीक मंत्री मूनगुंटीवार यांनी कलावंतांना मोठा आर्थिक आधार दिला. राजाश्रयाशिवाय लोक कलावंतांचे कल्याण होणार नाही. कल्याणकारी निर्णय व्हावेत यासाठी १७ ऑगस्ट २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मूनगुंटीवार व मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय लोककलावंतांचा मेळावा संपन्न होत आहे. या मेळाव्यात प्रत्येक लोककलावंतानी घरकुल मिळावे यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय होईल अशी अपेक्षा भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली.



लोक कलावंतांच्या भव्य मेळावा नियोजानासाठी आज संघर्षयोद्धा भाजपा संपर्क कार्यलय बीड येथे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, महाराष्ट्र प्रदेश सचिव, लोक कलावंत प्रकोष्ठ प्रमुख गणेश दहिफळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाड्यातील कलावंतांची बैठक संपन्न झाली.

या मेळाव्यास लोक कलावंत समिती मराठवाडा अध्यक्ष सुमित धुमाळ, वृद्ध कलाकार मानधन समिती सदस्य कैलास काटे, सांस्कृतिक प्रकोष्ठ जिल्हा संयोजक प्रमोद रामदासी, रामदास कदम, काशिनाथ उबाळे, शाम धोंगडे, रामदास धुमाळ, अशोक जाधव, तुकाराम ठोंबरे, परमेश्वर कराड, मोठे नाना, प्रभाकर महाराज कुटे, सिद्धेश्वर शिंदे, संजीवनी ताई, शेळके महाराज गैदास उगले, पत्रकार सचिन भंडारे, लिंबाजी ढवळे, भास्कर कांबळे, रामनाथ काटे, विलास काटे, मुरलीधर तरटे, अंकुश गरडकर, यांच्यासह लोक कलावंत मोठ्या संखेने उपस्थीत होते.

## संक्षिप्त वृत्त...

### जनहित पतसंस्थेला पतसंस्था फेडरेशनकडून तिसऱ्या वर्षी दिपस्तंभ पुरस्कार जाहीर

**येरमाळा, दि.२७ जुलै -**

येरमाळा येथील प्रा.संतोष तौर संस्थापक असलेल्या जनहित पतसंस्थेला महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनकडून सलग तिसऱ्या वर्षी दिपस्तंभ पुरस्कार जाहीर झाला आहे. जनहित पतसंस्थेला २०२४ चा छत्रपती संभाजीनगर विभागातून १० कोटी ते ३० कोटी गटातून प्रथम क्रमांक मिळाला आहे. हा पुरस्कार महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन मुंबई यांच्याकडून दिला जातो. जनहित पतसंस्था २००५ पासुन म्हणजे गेल्या २० वर्षापासुन येरमाळा व पंचक्रोशीत आर्थिक व्यवहारात कार्य करीत आहे. आज पर्यत संस्थेला उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे सहकाररत्न बॅको कर्णाडबॅकिंग पासुन फ ेडरेशनचा सलग तिसऱ्यांदा दिपस्तंभ पुरस्कार मिळाला आहे. सदरील पुरस्कार राज्यस्तरीय असुन याचे वितरण रामोजी फिल्मसिटी हैद्राबाद येथे दि.३ व ४ ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात येणार आहे. या यशाबदल संस्थापक प्रा.संतोष तौर, चेअरमन श्रुती माशाळकर व्हाइस चेअरमन नितिन कवडे सचिव दत्ता रणसिंग संचालक बळीराम नवले, गोवर्धन उगडे, रामकिसन कोकाटे, गणेश मोरे, सुनिल शिंदे अंकुश भगत, संगीता जाधवर व्यवस्थापक शिवप्रसाद घेवारे संस्थेचे कायदे विषयक सल्लागार ॲड.व्ही.के.माने व ॲड.महेंद्र कासार, मार्गदर्शक वल्लभ माशाळकर कर्मचारी समाधान भगत, अभिजीत पाटील, रमेश बारकुल, पवन ओव्हाळ, निशांत कांबळे, रोहीत घेवारे, निकीता वेदपाठक, जिवन जाधव यांच्यासह सर्व खातेदार ठेविदार सभासद व्यापारी उद्योजक व समस्त गावकरी यांनी जनहित परिवाराचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### बोगस पुजाऱ्यांवर कारवाई करणार : पो. नि खांडेकर यांची माहिती

**तुळजापूर, दि.२७ जुलै -**

तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात रात्री अपरात्री भाविकांना विचारपूस करणाऱ्या बोगस पुजाऱ्यांवर कारवाई करणार असल्याची माहीती पोलिस निरक्षक यांनी दिली. या बाबतीत अधिक माहीती अशीकी महाराष्ट्राची कुलस्वामीनी आई तुळजाभवानीच्या नगरीत मोठ्या प्रम ाणात भाविक भक्त दर्शनासाठी व धार्मिक विधी करण्यासाठी येतात भक्तांचे धार्मिक विधी करण्याचे अधिकार हे ठराविक पुजारी बांधवांना आहेत. परंतु मोठ्या प्रमाणात बोगस पुजारी हे भक्तांची फसवणुक करीत आहेत. त्यामुळे मंदीर संस्थानची व पुजारी बांधवांची नाहक बदनामी होत आहे. श्री. तुळजाभवानी मंदीराचे पुजारी ओळखपत्र असणाऱ्या पुजाऱ्यांना त्यामध्ये सवलत देण्यात यावी, अशी मागणी पुजारी मंडळाने केली होती. याची दखल पोलिस खात्याने घेऊन रात्री ११ वाजता पोलीस स्टेशन तुळजापुर येथील पेट्रोलिंगचे गाड्या पेट्रोलिंग करीत फिरत असतात. यापुढे रात्री १०.०० नंतर रस्त्यावर विनाकारण कोणी फिरत असेल तर त्यांचेकडे विचारपुस करुन त्यांचे ओळख पटवुन ते बोगस पुजारी असल्याची खात्री पटताच अश्या व्यक्तीवर कारवाई करण्याची तजवीज केल्याची माहीती पोलीस निरीक्षक पो.स्टे. तुळजापूर यांनी दिली आहे.

### सागर यांनी आता राजकारणात यावे : अहमद

**उमरगा, दि.२७ जुलै-**

निवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी राजकुमार सागर यांनी प्रशासकीय सेवेत असताना गोरगरीब गरजू माणसाला नजरेत ठेवून सेवा बजावली आहेत. शांत व शिस्तप्रिय व्यक्तिमत्व, दृढ अभ्यासू वृत्ती प्रशासकीय सेवेतील दांडगा अनुभव अशी सागर यांची ओळख आहे. प्रशासकीय सेवेतून ते जरी निवृत्त झाले तरी त्यांनी आता यापुढे राजकारणात येऊन गरिबांच्या कल्याणासाठी जरूर पुढाकार घ्यावेत, असे मत माजी मंत्री अनिस अहमद यांनी व्यक्त केली आहेत. सागर यांच्या सेवानिवृत्तीबद्दल त्यांच्या मित्र परिवाराकडून सेवापुर्ती कार्यगौरव सोहळ्यावेळी बोलत होते. यावेळी माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, विधानसभेचे माजी सभापती हरिभाऊ बागडे, उमरगा-लोहाराचे आ.ज्ञानराज चौगुले, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, माजी मंत्री डॉ.दशरथ भांडे, बिदरचे सीईओ डॉ.गिरीश बदोले, सिद्धार्थ भालेराव, दामू सागर यांच्या सौभाग्यवती वंदाराणी सागर, पिताश्री मंगेश व मातोश्री कस्तुरबाई सागर, पदमाकर कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती

# आ. राणाजगजीतसिंह पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे निलेगाव ते देवसिंगा नळ रस्ता मंजूर विरोधकांचे दावे खोटे : सरपंच पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै-**

तुळजापूरचे आमदार राणा जगजीत सिंह पाटील यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत देवसिंगा नळ ते निलेगाव पाच किमी डांबरीकरण रस्ता मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत सतत पाठपुरावा करून सात कोटी ७० लाख रुपये पर्यंत सदर कामास मंजुरी मिळवली असून या रस्त्याबद्दल विरोधक हा रस्ता आम्हीच मंजूर केला असल्याचा खोटा दावा करत असून या रस्त्याचे भूमिपूजनही लोकसभा निवडणुकीपूर्वी म्हणजे (मार्च) महिन्यात आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते झाले होते. यावेळी भाजपचे वसंत वडगावे, अरविंद पाटील, मा. नगरसेवक सज्जनराव साळूके उपस्थित असल्याचे सरपंच युवराज भीमाशंकर पाटील यांनी म्हटले आहे.

सदर रस्ता गेल्या वीस वर्षापासून प्रलंबित होता. यारस्त्याची अतिशय दयनीय व खराब अवस्था होती. यामुळे शेतकरी व मार्गावरील प्रवाशांना वाहतूक करणे जिकिरीचे ठरत होते.

गेल्या वीस वर्षांपासून लोकप्रतिनिधी म्हणून मिरवणाऱ्यानी या रस्त्याबद्दल कुठेही चकार शब्दात उल्लेख केला नसून खोटे लेटर पॅड दाखवून दिशाभूल करत असल्याचा आरोप केला आहे.

यामुळे रस्त्याबद्दल उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. यारस्त्यासाठी गेल्या दोन वर्षापासून संपूर्ण ग्रामपंचायत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या माध्यमातून राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा करून रस्ता मंजूर करून घेतला. त्यामुळे जनतेतून मोठ्या प्रमाणात आनंद व्यक्त होत आहे. देवसिंगा नळ हे गाव जिल्ह्याच्या टोकावर व तीन तालुक्याच्या सीमेवर असल्याने याकडे आतापर्यंत दुर्लक्षित होते परंतु माननीय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या मुळे रस्त्याला मंजुरी मिळाल्याने ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करतो असेही सरपंच युवराज भीमाशंकर पाटील यांनी केले.

# घोष यांच्या अध्यक्षतेखाली नगरपालिका बोगस बिल चौकशी समिती नेमावी : माजी मंत्री धस यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै-**

धाराशिव नगर परिषदेच्या विद्यमान मुख्याधिकारी श्रीमती वसुधा फड यांनी धाराशिव नगर परिषद अंतर्गत लेखासंहिता २०१३ प्रकरण कामे अंतर्गत नियम १३८ प्रमाणे कार्यवाही करीता कामाचा छाननी तक्ता तयार करून बोगस बिले काढली असल्यासंदर्भात माजी मंत्री सुरेश धस यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारी चौकशीच्या अध्यक्षपदी धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष, यांची नेमणूक करण्याचीमागणी माजी मंत्री सुरेश धस यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की धाराशिव नगर परिषदेच्या विद्यमान मुख्याधिकारी श्रीमती वसुधा फड यांनी धाराशिव नगर परिषद अंतर्गत लेखासंहिता २०१३ प्रकरण कामे अंतर्गत नियम १३८ प्रमाणे कार्यवाही करीता कामाचा छाननी तक्ता तयार करून बोगस बिले काढली संदर्भातील तक्रारीच्या चौकशीच्या अध्यक्ष पदी श्री. मैनक घोष, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक करण्यात यावी.

धाराशिव नगरपालिकेत मागील कार्यकाळात झालेल्या अनेक गैरव्यवहारांचे चौकशी अहवाल आणि त्यामुळे दाखल झालेले गुन्हे यामुळे धाराशिव नगरपालिकेचे प्रशासकीय कामकाजावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून तत्कालीन मुख्याधिकारी हरी कल्याण येलगटे यांच्या कार्यकाळातील अनुभवानंतर धाराशिव नगरपालिकेच्या मुख्याधिकारीपदी विराजमान झालेल्या श्रीमती वसुधा फड यांच्याकडून स्वच्छ कारभाराच्या शहरवासीय नागरिकांना अपेक्षा होत्या, परंतु त्यानंतरही फड यांचा कार्यकाळही असाच वादाच्या भोवऱ्यात आणि अनेक भ्रष्टाचाराच्या आरोपात आल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

### महाविद्यालयात ग्रीन क्लबच्या वतीने वृक्ष लागवड

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ जुलै-**

नळदुर्ग येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय येथे ग्रीन क्लब आणि वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने आज दिनांक २७ जुलै २०२४ रोजी शंभर वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचचे प्राचार्य डॉ.सुभाष राठोड यांनी परवानगी देऊन कार्यक्रमाला उपस्थित राहिले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रीन क्लब समन्वयक प्रा.डॉ.उद्धव भाले, सहसमन्वयक प्रा.डॉ.निलेश शेरे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ.विजय सावंत, बारीक शिंदे तसेच ग्रीन क्लब मधील पदाधिकारी किर्ती इटकरी (युवा अध्यक्ष) वृषाली घंटे (युवा उपाध्यक्ष), अभिषेक जाधव (कॅम्पियन कोऑर्डीनेटर्स), सुधा काळे (डाकुमेंटेशन कोऑर्डिनेटर) उपस्थित होते. त्याचबरोबर वृक्ष संवर्धनासाठी पुढाकार घेऊन व्यवस्थित नियोजन करणारे कार्यालयीन अधीक्षक धनंजय पाटील हेही उपस्थित होते. तसेच आयकूएससी समन्वयक प्रा.डॉ.शिवाजी घोडके आणि महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, संशोधक विद्यार्थी आणि ग्रीन क्लब मधील सर्व विद्यार्थी- विद्यार्थिनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पोलिस कर्मचाऱ्याविरुद्ध प्रशासकीय कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ जुलै-**

नळदुर्ग पोलिस ठाण्यातील पोलिस कर्मचारी नितीन शिंदे यांच्याविरुद्ध तात्काळ प्रशासकीय कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट ) जिल्हा उपाध्यक्ष व जळकोटचे उपसरपंच प्रशांत नवगिरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठविलेल्या निवेदनात केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, मी जळकोटचा उपसरपंच व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा (अजित पवार गट ) धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष या पदावर कार्य करीत आहे.मी जळकोट येथे वास्तव्यास असुन हे गाव नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या हद्दीत येते.

पोलिस ठाणे नळदुर्ग येथील पोलिस कर्मचारी नितीन भीमा शिंदे हे अज्ञात गावागुंडाना हाताशी धरून माझ्या पदाचा व नावाचा उल्लेख करून आपले अवैध धंदे बंद करणे बाबत प्रशांत नवगिरे यांनी तुमच्याविरुद्ध तक्रार दिली आहे, असे वारंवार सांगुन प्रशांत नवगिरे यांचा तात्काळ बंदोबस्त करा म्हणुन चिथावणी देत आहेत.

.त्यांच्या चिथावणीमुळे अज्ञात गावगुंडानी माझ्यावर पाळत ठेऊन प्राणघातक हल्ला करण्याचा प्रयत्न केला असुन अजुनही सदर अज्ञात हल्लेखोर माझ्या पाळतीवर आहेत. त्यामुळे माझ्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. मी कोणाविरुद्धही कसलीही तक्रार दिलेली नसताना हा पोलिस कर्मचारी जाणीवपुर्वक इतर कोणाच्या तरी सांगण्यावरून सुडबुद्धीने मला बदनाम करण्याचा प्रयत्न करीत आहे.संबंधित पोलिस कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी प्रशांत नवगिरे यांनी या निवेदनात केली आहे.

## लोकमान्य टिळक महाविद्यालयाचा वर्धापन दिनासह जाधव यांचा सेवानिवृत्तीनिम्मित सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.२७ जुलै-**

उमरगा तालुक्यातील कदेर गावातील लोकमान्य टिळक म हाविद्यालयाचा ५५ वा वर्धापन दीन व तसेच महेश मधुकरराव जाधव ग्रंथपाल यांचा सेवानिवृत्तीनिम्मित निरोप समारंभ कार्यक्रम संस्थेमार्फत आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून संस्थेत वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मुरलीधर जाधव, सचिव धनराज जाधव, सरपंच सतीश जाधव, सचिव भाऊराव काजळे, विलास पाटील, मु.अ बाळासाहेब गायकवाड, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शालेय गुणवत्ता वाढीसाठी वीरमणी पॅटर्न राबवण्याचे गरज माजी मंत्री सुरेश धस

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै-**

सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे महत्त्वाची बैठक पार पडली. यामध्ये धाराशिव बीड लातुर सह राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये गुणवत्ता वाढीसाठीचा व्ही. रमणी पॅटर्न राबविण्याबाबतही चर्चा झाली. माजी मंत्री सुरेश धस यांनी दिनांक १८ जुलै रोजी मुख्यमंत्री महोदयांना पत्राद्वारे याबाबतची विनंती केली होती, त्यानंतर काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत बैठक पार पडली.



शालेय शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी राज्याचा शालेय शिक्षण विभाग एआयच्या वापरासह विविधस्तरीय उपाययोजना करत आहे.

त्यांच्याशी छत्रपती संभाजीनगरचे तत्कालिन आयुक्त व्ही. रमणी यांनी राबविलेल्या पॅटर्नची सांगड घालण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. हा पॅटर्न जिल्हा परिषदांबरोबरच, राज्यातील महानगरपालिकांच्या शाळांत राबवण्यात येईल, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या बैठकीस राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, माजी राज्यमंत्री सुरेश आण्णा धस यांच्यासह मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, शालेय शिक्षण विभागाचे सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षणआयुक्त सुरज मांढरे, आदी उपस्थित होते.

## वागदरीत लाडकी बहिण योजनेचे २०० अर्ज



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२७ जुलै-**

तुळजापूर तालुक्यातील मौजे वागदरी गावात जवळपास दोनशे महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी अर्ज दाखल केले आहेत. गावातील एकही महिला या योजनेपासून वंचित राहू नये म्हणून सामाजिक कार्यकर्ते किशोर धुमाळ,एस.के.गायकवाड, किशोर सुरवसे, अंगणवाडी कार्यकर्ती पद्मीनीबाई पवार, म दतनीस रूपाली जाधव, ग्रामसेवक एम.एम.तांबोळी,सरपंच तेजाबाई मीटकर, उपसरपंच सुरेखा भालचंद्र यादव, सर्व ग्रा.प.सदस्य प्रयत्न करत आहेत.

महिलांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी आणि महिला सबलीकरणाच्या दृष्टीने अत्यंत म हत्त्वाचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे .दर महिन्याला एक हजार पाचशे रुपये अनुदान देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेची सुरुवात केली.सध्या संबंध महाराष्ट्रभर या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक महिला व बालविकास विभागा मार्फत अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील लोकप्रतिनिधीही योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत.त्याचाच भाग म्हणून मौजे वागदरी येथे तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत येथील ग्रामपंचायत सदस्य व कार्यकर्ते कामाला लागले आहेत.येथील भाजपाचे बुथ प्रमुख तथा मिडीया विभाग तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ यांनी दोनशे अर्ज मोफत स्वखर्चाने उपलब्ध करून दिले आहेत तर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड, भाजपाचे शाखा प्रमुख किशोर सुरवसे, सरपंच, उपसरपंच सर्व ग्रा.प.सदस्य अंगणवाडी कार्यकर्ती ,मदतनीस सर्व पक्षीय कार्यकर्ते लाडक्या बहिणीला अर्ज भरण्यासाठी सहकार्य करीत आहेत.आता पर्यंत र्ऑफ लाईन व ऑन लाईन मिळून गावातील जवळपास दोनशे महिलांनी अर्ज भरून संबंधित अंगणवाडी कार्यकर्ती पद्मीनीबाई पवार यांच्याकडे दिले आहेत. यातील पन्नास टक्के अर्ज ऑन लाईन झाल्याचे समजते.

# धाराशिव येथे रामकृष्ण आश्रमाच्या नवनिर्मित ध्यान मंदिराचा भव्य उद्घाटन सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ जुलै-**

स्वामी विवेकानंदांनी आपले गुरु रामकृष्ण परमहंस यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ कोलकाता जवळ हावडा जिल्हयात बेलूर येथे राम कृष्ण मठ व रामकृष्ण मिशन या जुळ्या संस्थांची १८९७ साली स्थापना केली. 'आत्मनो मोक्षार्थ जगत् हितायच' या ब्रीद वाक्याच्या प्रेरणेने हजारो सर्वत्यागी संन्यासी व गृहस्थ भक्त समाजाची तेव्हापासून निष्काम भावनेने आविरत सेवा करत आहेत.

आजमितीस रामकृष्ण मिशनची जगभरात २८२ आधिकृत शाखाकेंद्रे आहेत. आरोग्य, शिक्षण, कृषी, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन, ग्रामीण विकास, आध्यात्मिक समुपदेशन इत्यादि क्षेत्रात या शाखाकेंद्रांमधून समाजसेवा दिली जाते.

आपल्या धाराशिव शहरात सांजा चौक येथे भगवान श्रीराम कृष्णदेव, परमाराध्या माँ सारदादेवी आणि युगाचार्य स्वामी विवेकानंद यांच्या ध्यान मंदिराची वास्तू साडेतीन एकराच्या प्रशस्त जागेत उभी राहिली आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील रामकृष्ण मिशन आश्रमाचे प्रमुख श्रीमत् स्वामी विष्णुपादानंदजी महाराज हे धाराशिवच्या आश्रमात गेली १८ वर्षे नियमित मासिक सत्संग व विद्यार्थी आणि भक्तांचे समुपदेशन करत आहेत आणि या आश्रमाचे मार्गदर्शन करत आहेत. या आश्रमात ध्यान मंदिरासोबत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका निर्माण केली आहे.

या अभ्यासिकेचा लाभ अनेक विद्यार्थी विषेशतः स्पर्धा परिक्षांच्या तयारीसाठी घेत आहेत. आश्रमाच्या परिसरात साधुनिवास व भक्तनिवासाची सोय केली आहे. या आश्रमाचा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, दिनांक २८ जुलै २०२४ रोजी आयोजित केला आहे.

रामकृष्ण आश्रमाच्या नवनिर्मित ध्यान मंदिराचा मुख्य उद्घाटन सोहळा रविवार, दिनांक २८ जुलै २०२४ रोजी सकाळी ०९.०० ते दुपारी १२.३० या वेळेत सार्वजनिक सत्संग सभेने संपन्न होत आहे.

रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशन मुख्यालय, बेलूर मठचे सह महासचिव श्रध्देय श्रीमत् स्वामी बोधसारानंदजी महाराज यांच्या शुभहस्ते ध्यान मंदिराची प्रतिष्ठापना व उद्घाटन होणार आहे.

सकाळी ०५.०० वाजता मंगल आरती, ध्यान व संक्षिप्त पूजेने कार्यक्रमाचा शुभारंभ होणार आहे.

नवनिर्मित मंदिर परिक्रमा, उद्घाटन, प्रतिष्ठापना विशेष पूजा, हवन, नैवेद्य, विशेष आरती आणि पुष्पांजली हा कार्यकलाप सकाळी ०६.०० ते दुपारी १२.३० या वेळात योजिला आहे.

सार्वजनिक सत्संग सभेत प्रमुख अतिथी श्रीमत् स्वामी बोधसारानंदजी महाराज यांच्यासह रामकृष्ण मिशनच्या विविध आश्रमातील सहा ज्येष्ठ संन्यासी यांची मार्गदर्शनपर व्याख्याने होतील.

सर्व उपस्थितांसाठी दुपारी १२.३० ते ०२.३० या वेळात भोजन महाप्रसादाची व्यवस्था केली आहे. सायं आरती सायंकाळी ०६.३० वाजता होईल.

मंदिर उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी शहरातील तसेच परिसरातील भक्तांनी व नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहून या पर्वणीचा लाभ घ्यावा असे आवाहन स्वामी विष्णुपादानंदजी महाराज यांनी केले आहे.

**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनांक २५/०७/२०२४**

समस्त गावकरी मौजे. उमरगा ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार प्रवीण अनिल बनसोडे रा. कसगी ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नावः प्रवीण अनिल बनसोडे

सदरील व्यक्तीचा मौजे. उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. २६/०६/१९९९ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. १६/०७/२०२४ रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनांक २५/०७/२०२४**

समस्त गावकरी मौजे. कसगी ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार रामचंद्र सखाराम गुरव रा. कसगी ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नावः रामचंद्र सखाराम गुरव

सदरील व्यक्तीचा मौजे. कसगी ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०४/०१/१९६७ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. १६/०७/२०२४ रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

**जाहीर प्रकटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनांक २५/०७/२०२४**

समस्त गावकरी मौजे. कसगी ता.उमरगा जि.धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात अर्जदार लिना संजय गुरव रा. कसगी ता.उमरगा जि. धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नावः लिना संजय गुरव

सदरील व्यक्तीचा मौजे. कसगी ता. उमरगा जि. धाराशिव या ठिकाणी दि. २४/०२/२००२ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक. १६/०७/२०२४ रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार**

# पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २७ जुलै -**

राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली नांदेड जिल्हा नियोजन समितीची बैठक आज शनिवारी २७ जुलै २०२४ रोजी डॉ. शंकरराव चव्हाण, नियोजन भवन, मुख्य सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली.



या बैठकीला पालकमंत्र्यांसोबत खासदार अशोक चव्हाण, खा.डॉ.अजित गोपछडे, खा.वसंत चव्हाण, खा. नागेश पाटील आष्टीकर, खा. शिवाजी काळगे, आमदार बालाजी कल्याणकर, तुषार राठोड, मोहन हंबर्डे, राजेश पवार, शामसुंदर शिंदे, विक्रम काळे, भीमराव केराम, जितेश अंतापुरकर, माधवराव पवार, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल,जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, मनपा आयुक्त डॉ. महेश डोईफोडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हा नियोजन समितीच्या सर्व सदस्यांना या बैठकीला आमंत्रित करण्यात आले होते. यापूर्वी ८ जानेवारी रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुपालनास यावेळी मान्यता देण्यात आली. तसेच सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी गेल्या मार्च महिन्यात झालेल्या खर्चाला बैठकीमध्ये मान्यता घेतली गेली. गेल्या वर्षीच्या वार्षिक नियोजनात जिल्ह्यातील विविध विकास कामांवर जिल्हा वार्षिक योजनेतून ६५९ कोटी खर्च झाले आहे. ९९.९९ टक्के अशी ही खर्चाची आकडेवारी आहे.

तसेच सर्वसाधारण,अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना मिळून बनलेल्या जिल्हा वार्षिक योजनेच्या २०२४- २५ साठी मिळालेल्या आर्थिक तरतुदीच्या विनियोजनाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली . २०२४-२५ या वर्षासाठी ७४९ कोटीची तरतूद मंजूर असून त्यापैकी शासनाकडून २३१ कोटी निधी प्राप्त झाला आहे. जुलै अखेरपर्यंत वितरित झालेला निधी व झालेला खर्च याबाबतचा आढावा घेतला गेला.



# घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, २७ जुलै -**

हिमायतनगर येथील एका व्यापाऱ्याच्या दुकानात चोरी करणाऱ्या आरोपींना हिमायतनगर पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्याकडून एक लाख ४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

हिमायतनगर येथील जनता कॉलनीमधील सिध्देश्वर शंकरराव कदम यांच्या दुकानाचे शटर उघडून अज्ञात चोरट्यांनी दि.२१ जुलै रोजी ३६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या प्रकरणी हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या चोरीच्या तपासासाठी हिमायतनगर पोलिसांनी विशेष पथकाची स्थापना केली. या तपासात घरफोडी करणारा आरोपी श्यामसुंदर मारोती बनसोडे यास रेल्वेस्थानक येथून अटक करण्यात आली. त्याची चौकशी केली असता एका अल्पवयीन मुलाच्या मदतीने चोरी केल्याचे त्याने कबूल केले. त्याचबरोबर अन्य एका ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी त्याच्याकडून एक लाख ४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हि कारवाई पोलीस निरीक्षक अमोल भगत, सपोनि. मद्दे, सहायक पोलीस उपनिरीक्षक कोमल कागणे, पोहेका.श्यामसुंदर नागरगोजे, पवन चौदंत यांच्या पथकाने केली.

## संक्षिप्त वृत्त



### वृक्षारोपण करून जागवल्या वडिलांच्या स्मृती

**नांयगाव -** नायगाव तालुक्यातील मौजे अंचोली येथील दानशूर व्यक्तिमत्व दत्ता बालाजी पाटील मोरे यांनी आपल्या गावातील जिल्हा परिषद शाळे विषयी असलेला जिव्हाळा वडिलांच्या स्मरणार्थ दहा हजार रुपयांची विविध प्रकारची झाडे लावून आज खरी गरज कशाची हा आदर्श पुढे ठेवला आहे. पुण्यतिथीनिमित्त इतर बाबीवर खर्च न करता आपणच आपल्या गावात शिकलेल्या जिल्हा परिषद शाळे प्रति काहीतरी देणे लागते या उदात्त हेतूने भर पावसात खाजगी नर्सरीतून १०,००० रुपयांची विविध प्रकारची ऑक्सिजन देणारी झाडे आणून गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते वृक्षारोपण केले आहे. कुठलाही गाजावाजा न करता अचानक रात्री झाडांनी भरलेला टेम्पो शाळेत उतरवला आणि दुसऱ्या दिवशी वृक्षारोपण केले. ते दानशूर व्यक्तिमत्व म्हणून गावात परिचित आहेत. याही पुढे शाळेसाठी योगदान देण्याचा माझा मानस आहे असे त्यांनी यावेळी व्यक्त केले आहे. शाळेचे मुख्याध्यापक उत्तम गायकवाड अशा दानशूर व्यक्तिमत्त्वांच्या संपर्कात राहुन आपली शाळा नायगाव तालुक्यात प्रथम क्रमांकाची त्यांनी आणली आहे. यापूर्वीही मेजर विश्वंभर पाटील मोरे यांनीही सेवानिवृत्ती निमित्त शाळेत १०,००० रुपयांची झाडे लावून आपल्या गावात एक आदर्श परंपरा निर्माण केली आहे. माजी विद्यार्थी मेळाव्याच्या निमित्ताने अनेक कर्मचारी आणि उद्योगपती शाळेच्या विकासासाठी पुढे येणार आहेत. ही स्वागतार्थ बाब आहे अशी भावना गावकऱ्यातून व्यक्त होत आहे. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्ता पाटील मोरे, उपसरपंच प्रतिनिधी अशोक पाटील मोरे, मुख्याध्यापक उत्तम गायकवाड, भारत घोरपडे, सौ. स्वाती अडबलवार व विद्यार्थी यांच्या हस्ते ही वृक्षारोपण करण्यात आले.

**वायफळ खर्चाला पर्याय म्हणून वृक्षारोपण : दत्ता पाटील मोरे**

भविष्यात सर्वांपुढे फार मोठे आव्हान ठरणार आहे कारण पर्यावरण नष्ट झाल्यामुळे ऑक्सिजनचा तुटवडा पडत आहे त्यासाठी आपल्या वडिलांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कुठलाही वायफळ खर्च न करता पर्याय म्हणून ही झाडे लावली गेली असल्याचे दत्ता पाटील मोरे यांनी सांगितले.

### आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

**नवीन नांदेड -** शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील



बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त कीर्तनकार रामरावजी ढोक महाराज यांचे कीर्तन, रांगोळी स्पर्धा व आरोग्य शिबिराचे आयोजन मातोश्री मंगल कार्यालय कौठा येथे दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आले आहे. नांदेड दक्षिणचे शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे उद्घाटक माजी खासदार हेमंत पाटील, अध्यक्ष संजय मोरे, प्रमुख उपस्थिती आनंद जाधव यांच्या उपस्थितीत वाढदिवसानिमित्त दिनांक १ ऑगस्ट रोजी मातोश्री मंगल कार्यालय कौठा येथे सकाळी ९ वाजता रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रांगोळी स्पर्धेचे प्रथम पारितोषक अकरा हजार एकशे अकरा (१११११), द्वितीय पारितोषक सात हजार सातसे सत्याहातर (७७७७), तिसरे पारितोषिक पाच हजार पाचशे पंचावन्न (५५५५) असे ठेवण्यात आले असून सदरील रांगोळी रेखाटण्याचा विषय 'शिवचरित्रावरील रांगोळी' असा आहे या स्पर्धेचे निरीक्षक म्हणून प्रसिद्ध पेंटर श्रीरंग खानजोडे हे असून स्पर्धेत सहभाग नोंदवण्यासाठी खानजोडे पेंटिंग क्लासेस हडको या पत्त्यावर संपर्क साधावा यानंतर ११ ते १ या वेळी कीर्तनकार ह.भ.प. रामरावजी महाराज ढोक नागपूरकर यांच्या कीर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. व तसेच याच ठिकाणी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे तरी दक्षिण मतदार संघातील इच्छुक महिलांनी रांगोळी स्पर्धेत मोफत सहभाग घेण्याचे व ढोक महाराज नागपूरकर यांच्या कीर्तनाचा आनंद घेण्याचे आव्हान पप्पू गायकवाड शिवसेना उपशहर प्रमुख सिडको यांनी केले आहे.

### विशालगड प्रकरणाची सिबीआय चौकशी करण्याची मागणी

**भोकर -** महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्यातील विशाल गड किल्ला अतिक्रमण प्रकरणामधे एका समाजाला टार्गेट करुन त्यांच्या प्रार्थना स्थळाची नासधूस करुन विटंबना केली यावेळी महिला लहान बालकांना मारहाण करुन हाकलून लावले व त्या भागात दहशत निर्माण करण्यात आली या घटनेप्रकरणी हल्लेखोरा वर गुन्हे दाखल करुन या गंभीर घटनेची सीबीआय मर्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी राष्ट्रीय लोकजनशक्ती पार्टी च्या वतीने उपविभागीय अधिकारी भोकर यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी तालुका अध्यक्ष मो. मझहरोद्दिन सामाजीक कार्यकर्ते इम्रान अहमद शेख अथर भाई डॉ. मक्सुद अली आदी सामाजीक कार्यकर्ते उपस्थित होते.

### गिरजा वाघमारे यांचे निधन

**उमरी** - उमरी तालुक्यातील मौजे बितनाळ येथिल जेष्ट महिला श्रीमती



गिरजाबाई गंगाराम वाघमारे यांचे वृद्धपकाळाने दि २५ जुलै रोजी निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९५ वर्ष होते. त्यांचा अंत्यसंस्कार दि २६ जुलै रोजी २:३० वाजता बितनाळ येथेच स्मशानभुमित करण्यात आला. त्यांच्या पश्च्यात चार मुले, दोन मुली, नातवंड असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण वाघमारे त्यांच्या आई होत.

# ओबीसी समाज उतरला रस्त्यावर; राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, २७ जुलै -**

हदगाव तालुक्यातील कवाना येथील नंदी महाराज मंदिर परीसरात दत्तात्रय अनंतवार हे मराठा समाजाला दिल्या गेलेल्या ओबीसी प्रमाणपत्र सरसकट रद्द करण्यात यावेत यासाठी रविवार २१ जुलै पासून अमरण उपोषणास बसले असून त्यांच्या उपोषणास हदगांव -हिमायतनगर तालुक्यातील ओबीसी समाज बांधवाकडुन दिवसेंदिवस उपोषणाला वाढता पाठींबा मिळत आहे. शनिवार २७ जुलै रोजी उपोषणाचा सातवा दिवस असुन त्यांची प्रकृती बिघडत चालली आहे. स्थानिक प्रशासन वगळता लोकप्रतीनीधीसह शासनाने या गंभीर विषयांकडे पाठ फिरवली असल्याने ओबीसी समाज बांधवानी रोष व्यक्त करीत समाजाने एकवटत रस्त्यावर उतरण्याचा इशारा प्रशासनास देत शनिवार सत्तावीस जुलै रोजी नागपूर तुळजापूर राज्य महामार्गावर बरडशेवाळा बायपास वर केलेल्या रास्ता रोको ला हदगांव हिमायतनगर तालुक्यातील



ओबीसी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. एक तास रास्ता रोको दरम्यान तालुक्यातील समाज बांधवानी आपल्या भावना व्यक्त करीत नंतर कवाना येथे उपोषणास भेट दिल्याने कवाना येथे ओबीसी समाज बांधवाची गर्दी होती.उपोषणासह रास्ता रोको दरम्यान परीस्थीतीवर तहसीलदार विनोद गुडमवार ,मनाठा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमाकांत पुणे आपल्या प्रशासनास घेऊन लक्ष ठेवून होते.

उपोषण कर्ते दत्तात्रय अंनतवार यांच्या प्रकृती बिघडत चालली असून जोपर्यंत वरिष्ठ शासन पातळीवर निर्णय घेणार नाहीत यावर उपोषण सुरूच राहील यावर ठाम आहेत. शनिवारीच जिल्ह्याच्या ठिकाणी पालकमंत्री गिरीश महाजन उपस्थित असल्याने ते दखल घेतील की नाही याकडे सर्वाचेच लक्ष लागले आहे.

# आ. केराम यांनी मनावर घेतले अन् दुसऱ्याच दिवशी विद्युत रोहित्र बसले

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, २७ जुलै -**

किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांच्या प्रयत्नामुळे बोधडी खुर्द येथील तांडावस्तीत तात्काळ नवीन विद्युत रोहित्र उपलब्ध झाल्याने मागील ५ दिवसापासून अंधारात असलेल्या तांडावस्तीतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



किनवट तालुक्यातील बोधडी खुर्द हे गाव अत्यंत मागास व दुर्गम असून चार दिवसांपूर्वी वादळीवारा व सतत धार पावसामुळे तांडावस्तीत वीज गुल होऊन विद्युत रोहित्र जळाले.चार दिवसापासून पावसाची रीपरीप त्यात वीज गुल असल्याने येथील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासह अंधारात दिवस रात्र गुजारा करावा लागला. विजेअभावी होणारा त्रास लक्षात घेऊन बोधडी खुर्द ग्रामपंचायतचे उपसरपंच नामदेव कराड यांनी बोधडी बु. येथील विद्युत वितरण कंपनी कार्यालयाकडे निवेदन सादर करून नवीन रोहित्र, विजेचे खांब व लोम्बकाळणाऱ्या तारा त्वरित बसविण्याची मागणी केली. परंतु तीन दिवस उलटले तरी विजेची समस्या कायम होती. दरम्यान या संदर्भात भाजपा ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाबुराव केंद्रे यांनी दि २५ जुलै रोजी आमदार भीमराव केराम यांच्यासमोर तांडा वस्तीतील विजेची समस्या मांडल्यानंतर



आ केराम यांचा विद्युत कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याना फोन जाताच बोधडी बु येथील विद्युत कार्यालय खडबडून जागे झाले व २६ जुलै रोजी बोधडी खु येथील तांडावस्तीत नवीन रोहित बसविण्यात आले. आ भीमराव केराम यांच्या एका फोनमुळे तात्काळ नवीन रोहित्र उपलब्ध झाल्याने येथील नागरिकातुन समाधान व्यक्त होत आहे.

# करडखेड-मरखेल -हाणेगाव रस्त्याचा मलमपट्टीनंतर दोन महिन्यात खड्डे पडण्यास सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, २७ जुलै -**

तालुक्यांतील करडखेड-हाणेगाव -कामाजीवाडी या रस्त्यावर देगलुर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने खड्डे दुरुस्तीचे काम काही दिवसांपूर्वी केले होते. परंतु, रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे बुजवण्याचे काम निकृष्ट दर्जाचे केले असल्याचा आरोप प्रवाशांनी व नागरिकांना मनस्ताप होत असुन भागातील महत्त्वाचा रस्ता आहे. परंतु दर वर्षाला या रस्त्याची दुरुस्ती केले दोन महिन्यात खड्डे पडणे सुरू झाले असून देगलुर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आशिर्वादाने या रस्त्यावर पुन्हा अनेक ठिकाणी खड्ड्याचे साम्राज्य झाल्याने येथील रस्त्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

देगलुर तालुक्यातील करडखेड ते हाणेगाव दळवळण्यासाठी तेलंगणा कर्नाटक आंध्रा या तीन राज्याच्या सीमेला जोडणाऱ्या या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली होती. रस्त्यावरील खडी उघडी पडली आहे, त्यामुळे दुचाकी वाहने घसरून अपघात होत आहेत. शासनाचे लाखो रुपये निधी मंजूर झाल्याने या रस्त्यावरील काही दिवसांपूर्वी देगलुर सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची तात्पुरतीची मल्लमपट्टी केली होती दर वर्षाला शासनाने या रस्त्यावर लाखो रुपये निधी दुरुस्तीसाठी निधी खर्च केला जातो . परंतु दुरुस्तीच्या नावाखाली ठेकेदाराने शासनाचे लाखे रुपये निधीचा वरचेवर मलापट्टी करून निधीची



विल्हेवाट लावल्याने या रस्त्याची परिस्थिती जैशी थी वैशी राहील्याने पावसाळा सुरू झाल्यानंतर जुन ते जुलै महिन्यात झालेल्या पावसानंतर दुरुस्ती केलेल्या स्त्यावर खड्डे पडण्यास सुरू झाल्यामुळे अपघातीची शक्यता नाकारण्यात येत नाही . जून जुलै महिन्यात पावसानंतर मलमपट्टी केलेल्या रस्त्यावर एक दोन महिन्यात खड्डे पडण्यात सुरुवात झाले असून झालेल्या मलमपट्टी रस्ता तयार करताना रस्त्याचा गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत . शासनाने दरवर्षी खड्डे बुजवण्यासाठी या रस्त्यावर लाखो रुपये निधी खर्च केला जातो .निकृष्ट दर्जाच्या कामामुळे पुन्हा करडखेड मरखेल रस्त्यावरील खड्ड्यांमुळे हा रस्ता पार करताना ग्रामस्थांना मनस्ताप सहन करत पुन्हा खड्ड्यातूनच प्रवास करावा लागत आहे. बांधकाम विभागाचे अधिकारी जाणीवपूर्क याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे संबंधित विभागाने या सर्व रस्त्याची पुन्हा दुरुस्ती करावी, अशी मागणी होत आहे.

# बालाजी गाडेंच्या एकाधिकारशाहीवर निशाणा

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड, २७ जुलै -**

नांदेड उत्तर युवक काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी बालाजी गाडे यांची निवड होऊन आता तीन महिने उलटून गेली आहेत. तरी भोकर मतदारसंघातील युवकच्या तालुकाध्यक्ष पदासहित सर्वच पदांची नियुक्त्या जाणीवपूर्वक होत नसल्याने लोकसभा निवडणुकीत जीवाचे रान करून खा. वसंतराव चव्हाण यांचा प्रचार करणाऱ्या काँग्रेसच्या अनेक युवकांनी मुदखेड येथील युवक काँग्रेसच्या बैठकीत गाडे यांच्या एकाधिकारशाहीवर निशाणा साधला. या बैठकीत बराच राडा झाल्याची चर्चा असून युवक काँग्रेसचा सावळा गोंधळ उघडकीस आला आहे.

बालाजी गाडे यांची उत्तर युवक जिल्हाध्यक्ष पदी एप्रिल महिन्यात नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर आजपर्यंत उत्तर भागातील कुठल्याच नियुक्त्या आजपर्यंत करण्यात आल्या नाहीत. लोकसभेत भाजपाचा आणि बहीण लाडकी योजनेचाही कालपर्यंत प्रचार करणाऱ्या एका युवकास उत्तर जिल्हा युवक काँग्रेसमध्ये पहिली नियुक्ती करण्यात आल्याने समाज माध्यमातून युवक काँग्रेसच्या भूमिकेवर काँग्रेस पक्षातील युवकांनीच सडकून टीका केली. तसेच मध्यंतरी ज्यांना युवकाची पदे हवी आहेत, त्यांनी थेट संपर्क करावा अशीही एक पोस्ट समाज माध्यमात आल्याने त्यावर भाजपच्या एका ऍक्टिव्ह कार्यकर्त्याने युवक काँग्रेसला पदांचाही लिलाव करण्याची वेळ आली आहे अशी खरमरीत टीका समाज माध्यमातून केली. त्यावर बरीच उलटसुलट चर्चाही झाली. यातच आता मुदखेड येथे युवक काँग्रेसच्या भरलेल्या इच्छुकांच्या बैठकीत मोठा वाद उघडकीस आला असून शिवाजी वडजे, बळवंत पाटील यांनी बालाजी गाडे यांच्या एकाधिकारशाहीवर बोट ठेवत चुकीच्या नियुक्त्या केल्यास काँग्रेस पक्षाला मोठा फटका बसणार आहे असे निक्षूण सांगितले आहे.

**काँग्रेस कमिटीने चौकशी करावी : शिवाजी वडजे वाईकर**

युवक काँग्रेसमध्ये गेली तीन महिने सगळी पदे खिशात घेऊन फिरणाऱ्या बालाजी गाडे यांची एकाधिकारशाही खपवून घेतली जाणार नाही. भोकर मतदारसंघात आम्ही गेली १५ वर्ष काम करतो आहोत, आज कुणाच्या इशाऱ्यावर युवक काँग्रेसचे काम चालू आहे याची चौकशी जिल्हा काँग्रेस कमिटीने करावी, अन्यथा याचा विधानसभा निवडणुकीत मोठा फटका बसू शकतो. अशी भिती भोकर युवक काँग्रेस विधानसभा माजी सरचिटणीस शिवाजी वडजे वाईकर यांनी व्यक्त केली.

**चळवळीपेक्षा कुणी मोठा नाही : प्रा. संदीपकुमार देशमुख**

काँग्रेस ही एक चळवळ आहे. व्यक्तिविशेष पेक्षा ही विचाराची लढाई आहे असे खा. राहुल गांधी यांचे आदेश आहेत. तेव्हा चळवळी पेक्षा इथे कुणीच मोठा नाही. प्रामाणिक युवकांना युवकची पदे मिळाली पाहिजेत, त्यामुळे मर्जीतील लोक शोधण्याची आवश्यकता नाही, अन्यथा चळवळीचे नुकसान होईल. असे मत भारत जोडो न्याय यात्री प्रा. संदीपकुमार देशमुख यांनी व्यक्त केले.

# माजी खा. चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त कीर्तनांचा भरगच्च कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, २७ जुलै -**

लोकनेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघातील विविध गावांमध्ये कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. ३० जुलै ते ५ ऑगस्ट कालावधीत या भागात भाविकांसाठी भक्तीरसाची वारी आयोजित केली आहे. त्यामुळे आयोजित कीर्तन सोहळ्याला उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीच्या वतीने संयोजक प्रवीण पाटील चिखलीकर यांनी आले आहे.

आपल्या विकास कामातून आणि जनसंपर्कातून जनसामान्यांच्या हृदयात आपले आढळ असे स्थान निर्माण करणारे लोकनेते मन्याड चा वाघ माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस येत्या २ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमानी साजरा करण्यात येणार आहे . दरम्यान वाढदिवसानिमित्त अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. याही वर्ष विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाय वाढदिवसानिमित्त कंधार - लोहा विधानसभा मतदारसंघातील भाविक भक्तांना



भक्ती रसात न्हाहून निघता यावे यासाठी विविध ठिकाणी कीर्तन सोहळे आयोजित करण्यात आले आहेत. .

दिनांक ३० जुलै रोजी हभप बाबाजी महाराज काटगावकर यांचे कीर्तनाचा सोहळा कंधार तालुक्यातील शिरढोण येते सायंकाळी सहा ते आठ या वेळात आयोजित करण्यात आला आहे. साईनाथ मुक्ताराम पाटील कपाळे यांच्या पुढाकारातून हा कीर्तन सोहळा पार पडणार आहे . दिनांक एक ऑगस्ट रोजी हरिभक्त पारायण पुरुषोत्तम महाराज बुलढाणेकर यांच्या कीर्तनाचा सोहळा कंधार तालुक्यातील आलेगाव येथे सायंकाळी ६.०० वाजता सुरू होईल. संग्राम मोरे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला आहे. दिनांक ३ ऑगस्ट रोजी हरिभक्त परायण साध्वी सोनाली दिदि यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम सुनील मोरे यांच्या आयोजनातून लोहा तालुक्यातील सोनखेड येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. सायंकाळी पाच वाजता दत्ता वाले यांच्या आयोजनातून व्यंकटेश गार्डन मंगल कार्यालय लोहा येथे हरिभक्त पारायण विशाल महाराज खोले यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दिनांक ४ ऑगस्ट रोजी ऊमरा सक्रलच्या वतीने मामा मंगल कार्यालय मारताळा येथे दु.४.०० वा.हरिभक्त पारायण रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दिनांक पाच ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता बारा ज्योतिर्लिंग मंदिर माळाकोळी येथे नाना तिडके यांच्या पुढाकारातून रामायणाचार्य रामराव महाराज ढोक यांचा कीर्तन सोहळा पार पडेल आणि वाढदिवसाच्या दिवशी म्हणजेच दिनांक २ ऑगस्ट रोजी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या आयोजनातून पंचाली मंगल कार्यालय बहादरपुरा भुईकोट किल्ल्याजवळ दुपारी १.०० वाजता हरिभक्त पारायण ज्ञानेश्वर माऊली पठाडे (करजतकर) नगरकर यांच्या कीर्तनाचा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला आहे . आयोजित करण्यात आलेल्या सर्वच भक्ती रसाच्या कीर्तन सोहळ्याला भाविक भक्तांनी आणि नागरिकांनी उपस्थित राहावे असे अहवान आयोजकांच्या वतीने करण्यात आले.